
माझी
आई
संपादक
डॉ. स्नेहल तावरे

# माझी आई

संपादक

डॉ. स्नेहल तावरे

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न कला–विज्ञान–वाणिज्य महाविद्यालय,
पुणे ५

आणि

स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने

❖ स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १०१०

❖ माझी आई

❖ **प्रकाशक आणि मुद्रक :**
श्री. एल. व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे – ४११ ०३०.
टेलिफॅक्स : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
ई–मेल : snehavardhan@vsnl.net

❖ © मॉडर्न कला–विज्ञान–वाणिज्य महाविद्यालय, पुणे ५

❖ **प्रथमावृत्ती :** २६ फेब्रुवारी २०१४

❖ **मुखपृष्ठ :** राजेंद्र गिरधारी

❖ **अक्षरजुळणी :** सॉफ्टवर्ल्ड सर्व्हिसेस, पुणे

❖ **मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटर्स, पुणे

❖ ISBN 978-93-80321-64-6

❖ **पृष्ठसंख्या :** ८०

❖ मूल्य : ₹ ५०/–

'मॉडर्न'मधील प्रत्येकाला
आईसमान असणाऱ्या
**मा.प्रा.सौ. ज्योत्स्ना एकबोटे**
यांना
आदरपूर्वक अर्पण.

# अनुक्रमणिका


❖ संपादकीय - डॉ. स्नेहल तावरे / ७

१. माझी आई - प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव / ९

२. माझी चैतन्यशील आई - डॉ. स्नेहल तावरे / १२

३. कलेतून आनंद मिळविणारी माझी आई - डॉ. मधुरा कोरान्ने / १५

४. हे ऋण जन्मदेचे न फिटे - प्रा. वंदना जोशी / १७

५. माझी शिस्तप्रिय आई - डॉ.वैजयंतीमाला जाधव-भोसले / २०

६. माझी सुंदर आई - डॉ. संयोगिता नाईक / २३

७. माझी कृतार्थ आई - गायत्री पंडित / २५

८. माझी आई - 'सरसवती' - केसरीनाथ न. काकडे /२७

९. माझी आदर्श आई - अनुराधा मोहरे / ३१

१०. आई म्हणजे मंदिराचा कळस - नीलिमा मधे / ३३

११. माझी आई, माझी मैत्रीण - पल्लवी मस्तुद / ३५

१२. माझी आई 'ममता' - प्राजक्ता खाणेकर / ३७

१३. आई माझा गुरू - सुनील पोकरे / ३९

१४. मला घडविणारी आई - रूपकुमार यादव / ४१

१५. माझी धैर्यवान आई - सुनीता कांबळे / ४३

१६. माझी शांत आई - शांताराम पोखरकर / ४६

१७. स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी - राहुल हांडे / ४९

१८. मातृत्वाचा सुगंध - नयना पाचारणे / ५१

१९. आईची शिकवण - प्रतिभा तोरे / ५३

२०. आई म्हणजे ईश्वर - संगीता जाधव / ५६

२१. आईचा सहवास - श्रीकांत कुलकर्णी / ६०

२२. माझी कर्तबगार आई - सीमा पवार / ६४

२३. अशी माझी आई - ईश्वर तांबे / ६६

२४. माझ्या श्रीमंत माता - दीपक तिरूखे / ६८

२५. माझी प्रेमळ आई -रोहित भुजबळ / ७०

२६. मातृदेवो भव - रोजा चावरे / ७२

२७. माझी कष्टाळू आई - आशा खटिंग / ७५

# संपादकीय

मानवी जीवनाला 'वात्सल्य, प्रेम, प्रेरणा आणि स्फूर्ती' देऊन अंधारातून प्रकाशवाटेवर आणणारा नितांत रमणीय शब्द म्हणजे 'आई.' 'मा, माता, माय, माउली' अशा अनेक शब्दांतून विविध रूपांत भेटणारा मातृभाव सदैव वंदनीय राहिला आहे आणि राहणार आहे. मानवातील प्रेमाला मातृप्रेमाचे अधिष्ठान लाभलेले आहे. आईच्या प्रेमाचे मोजमाप करता येत नाही. तिच्यातील वात्सल्यभाव हा समान असतो. आई ही शिकलेली असो वा अशिक्षित असो, श्रीमंत असो वा गरीब असो; तिच्या प्रेमाचा जागतिक स्तरावर विचार केल्यास तो एकसारखाच असतो असे लक्षात येते. म्हणजेच देशकालाचे बंधन मातृप्रेमाला नाही.

अपत्याचे संगोपन करण्यात आईचा सिंहाचा वाटा आहे. पंख फुटलेली पाखरे उडून जातात; पण आपण आईभोवतीच आयुष्यभर घोटाळत राहतो. म्हणूनच मॉडर्नमधील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील 'आई'बद्दलचा कृतार्थ भाव 'माझी आई' या पुस्तकातून व्यक्त केला आहे. सन्मान, प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांची आईबद्दलची भावना आणि एखाद्या सर्वसामान्य विद्यार्थ्याची भावना समानच आहे; केवळ शब्द प्रगट करण्याच्या सामर्थ्यामध्ये फरक दिसून येतो इतकेच.

मॉडर्न महाविद्यालयातून सर्वसमावेशक विषयावर एखादे पुस्तक प्रकाशित व्हावे अशी माझी खूप दिवसांपासूनची इच्छा होती. प्रा.डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्याजवळ मी अनेकदा ती व्यक्त केलेली होती. सर्व लेख एकत्रित करून ते फाईलमध्ये संग्रहित करावे असा विचार करीत असतानाच आमच्या प्राचार्यांनी 'माझी आई' पुस्तक प्रकाशित करू असे आश्वासन देताच आमच्या मराठी विभागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. आणि अतिशय अल्पावधीमध्ये हे पुस्तक प्रकाशित करता आले याचा मला मनस्वी आनंद होत आहे. एक कृतार्थतेची भावना माझ्या मनात आहे. अर्थात सर्व श्रेय डॉ. राजेंद्र झुंजारराव यांचेच आहे. त्यांनी या पुस्तकाची 'पाठराखण' केली नसती तर सर्व महाविद्यालयांनी अनुकरण

करावे असे आदर्शवत् पुस्तक माझ्याकडून झाले नसते. त्यांच्या सहकार्याबद्दल मनापासून धन्यवाद.

मॉडर्नचा आणि माझा १९६२ सालापासूनचा संबंध आहे. या ५२ वर्षांच्या कालावधीतील माझ्या वाटचालीत 'मॉडर्न'चा सिंहाचा वाटा आहे हे मी विनम्रपणे नमूद करू इच्छिते.

चर्चासत्रामध्ये पुस्तकाचे प्रकाशन करण्याची परंपरा यावर्षीही मला चालू ठेवता आली याबद्दल प्राचार्य डॉ.राजेद्र झुंजारराव यांची मी आभारी आहे.

मा.प्रा.डॉ. गजानन एकबोटे सर, कार्याध्यक्ष प्रो.ए.सोसायटी यांनी सातत्याने जे प्रोत्साहन दिले त्यामुळेच मॉडर्न महाविद्यालयातील मराठी विभागाला दोन आंतरराष्ट्रीय, एक राष्ट्रीय आणि अनेक राज्यस्तरीय चर्चासत्रांचे आयोजन करता आले. त्यानिमित्ताने अनेक मोठ्या व्यक्तींनी महाविद्यालयाला भेटी दिल्या याबद्दल त्यांची मी ऋणी आहे.

माझ्या कल्पनेला प्रतिसाद देणारे प्राध्यापक आणि विद्यार्थिमित्रांचे मी आभार व्यक्त करते. पुस्तकाच्या मुद्रितशोधनासाठी मदत करणारी विभागातील डॉ. वैजयंतीमाला जाधव, चित्रकार श्री. राजेंद्र गिरधारी आणि संगणकीय अक्षरजुळणी करणारे श्री. विलास भंडारी यांची मोलाची मदत झाली.

'माझी आई' या पुस्तकाचे आपण स्वागत कराल अशी आशा आहे.

**-डॉ. स्नेहल तावरे**
प्रमुख, मराठी संशोधन केंद्र आणि
पदव्युत्तर मराठी विभाग, मॉडर्न महाविद्यालय
आणि
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, पुणे विद्यापीठ



## माझी आई

**डॉ. राजेंद्र झुंजारराव**
**प्राचार्य**

''एखाद्याने मिळविलेली धन-संपत्ती चोरी केली जाऊ शकते; पण त्याने मिळविलेले विद्या-धन कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.'' हा माझ्या आईने मला लहानपणी सांगितलेला विचार माझ्या शालेय जीवनापासून पीएच.डी.च्या शिक्षणापर्यंत प्रेरणादायी ठरलेला आहे. स्वत: फक्त इयत्ता चौथीपर्यंत शिक्षण घेतलेल्या माझ्या आईने एकत्र कुटुंबातल्या आमच्या सख्ख्या-चुलत सर्व भावंडांना शिक्षणासाठी प्रेरित केले. शाळेतून घरी आल्यानंतर ती दिवसभरात शाळेत काय-काय घडले याची माहिती आम्हा भावंडांकडून घेत असे आणि आम्ही गृहपाठ करत असताना शेजारी बसत असे. सह्याद्रीच्या कुशीत नाणे घाटाच्या पायथ्याशी वसलेल्या, पंधरा-वीस घरांच्या वैशाखरे या गावी आईचा जन्म झाला व चौथीपर्यंतच शाळा उपलब्ध असलेल्या त्या गावात तिचे चवथीपर्यंतचे शिक्षण झाले. शिक्षणासाठी मुलींना परगावी पाठवण्याचा त्याकाळी प्रश्नच नव्हता.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील वैशाखरे या गावी सधन अशा देशमुख कुटुंबात आईचा जन्म झाला. बालपण श्रीमंत देशमुख कुटुंबात गेले. देशमुखांच्या दिमाखदार वाड्यात तिचे बालपण लाडात गेले. त्या काळी सरकारी नोकरीत असलेल्या मुलाशी म्हणजे माझे वडील श्री. शंकर नारायण झुंजारराव यांच्याशी तिचे लग्न झाले. वडलांचे कुटुंब मात्र गरीब होते; परंतु केवळ सरकारी नोकरीत असलेल्या मुलाशी आपल्या मुलीचे लग्न (माझ्या आईचे) एका गरीब घरातील मुलाशी (माझ्या वडलांशी) झाले. वडलांच्या घरबांधणीसाठी आईच्या वडलांनी लाकूड-वासे देऊन मदत केल्याचे आई-वडलांच्या किरकोळ भांडणातल्या संवादातून आम्हाला लहानपणीच समजले होते.

आमच्या लहानपणी आम्ही वीस-पंचवीस जणांच्या एकत्र कुटुंबात वाढलो. वडील व दोन चुलते, आई व चुलता, आम्ही सहा सख्खी

भावंडे, नऊ चुलत भावंडे, शिक्षणासाठी आमच्या घरी राहायला आलेली नातेवाइकांची मुले व शेतीची कामे करणारी गडीमाणसे मिळून वीस-पंचवीस जणांचा वावर घरामध्ये असे. भात-शेतीच्या काळात ही संख्या तीस-पस्तीसवर जात असे. माझे वडील व दोन्ही चुलत्यांनी मिळून १९७३ मध्ये आमचे जुने घर पाडून त्या जागी दोन मजली नवीन घर बांधले. जुन्या कुडाच्या घरातून आम्ही विटेच्या भिंती असलेल्या चांगल्या घरात तेव्हापासून राहिलो.

सर्वांत मोठ्या भावाची पत्नी म्हणून आणि सासू-सासरे लवकर वारल्यामुळे आईने सर्वांत ज्येष्ठ महिलेची भूमिका पार पाडत कुटुंब चालविले व सर्वांचा आईच्या मायेने सांभाळ केला. आईची स्मरणशक्ती, त्यांच्या नाते-संबंधांबद्दल, मुलांबद्दल, घटनांबद्दल सर्व गोष्टी माहीत असलेली, लक्षात असलेली आई म्हणजे एखादा 'एन्सायक्लोपीडिया'च आहे. वयाच्या पंचाहत्तर वर्षांत आजही आईची स्मरणशक्ती उत्तम आहे.

वडलांची आरोग्य विभागातली सरकारी नोकरी ही अनेक ठिकाणच्या बदलीची नोकरी ठरली होती; त्यामुळे महाराष्ट्रातल्या अनेक ठिकाणी वडलांच्या नोकरीतील बदलीमुळे आईच्या व्यवहारी ज्ञानात व भौगोलिक ज्ञानात भर पडत गेली.

आईला देवपूजा, धार्मिक कार्य, संतोषीमातेचे व्रत, उपास-तापास, जपमाळ इ. गोष्टींची आवड असल्याचे आम्ही लहानपणापासून पाहिलेले आहे. वयाच्या पंचाहत्तर वर्षांतही जपमाळ, देवपूजेमुळे तिने तिच्या मनाची शांतता जपलेली आहे.

तीस-चाळीस घरांच्या आमच्या पारतळे या गावामध्ये अर्थातच दवाखान्याची सोय नव्हती व आजही नाही; त्यामुळे गावात कोणी आजारी पडल्यास आरोग्य विभागात वडील काम करत असल्यामुळे तापावरील औषध घेऊन जात असत. एखादे लहान मूल आजारी पडल्यास प्रथमत: शेजारपाजारच्या ज्येष्ठ गृहिणी आजारी मुलाच्या भोवती एकत्र बसून संवाद साधण्याची अनोखी उपचार पद्धती लहानपणी मी अनुभवली आहे. आजार बरे करण्याच्या अनेक 'थेरपी' आज उपलब्ध आहेत; परंतु सद्हेतूने एकत्र आलेल्या ज्येष्ठ गृहिणींनी, आजारी लहान मुलाच्या भोवती बसून, एकमेकींशी संवाद साधून, लहानसहान घरगुती उपाय करून ते मूल बरे करणे या थेरपीला काय नाव द्यावे हे आजही समजत नाही. कदाचित या 'थेरपीला' 'सुसंवाद व सद्इच्छा थेरपी' म्हणावे लागेल.



मनाने हळवी व काळजी करण्याचा स्वभाव असलेल्या आईला, आजही नातेवाईक भेटून जेव्हा तिची मुले शिकल्याबद्दल तिचे कौतुक करतात तेव्हा तिला फार समाधान वाटते. ''तुमचा एक मुलगा प्राचार्य व दुसरा मुलगा वकील झालाय, तुम्ही नशीबवान आहात.'' हे ऐकून अतिशय आनंदी झालेला आईचा चेहरा नेहमीच माझ्या डोळ्यासमोर असतो.

❖

## माझी चैतन्यशील आई

**डॉ. स्नेहल तावरे**

वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षीही उत्साहाने बोलणारी, अगत्यशील आणि वार्धक्याचेही तेज चेहऱ्यावर ओसंडून वाहणारी माझी आई, मला आयुष्यात सततच स्फूर्तिदायी वाटते. माझे वडील डॉ. पंजाबराव जाधव यांच्याशी तिचा विवाह १९५० साली झाला आणि या दोघांनी तब्बल साठ वर्षे वैवाहिक जीवन गुण्यागोविंदाने उपभोगले. वडील सुरुवातीला रयत शिक्षण संस्थेत होते. त्यांना पगारही तसा कमीच होता. त्याही परिस्थितीत वडलांनी शिक्षण चालू ठेवले. आम्ही दोघे भावंडे- शाळेत आणि नंतर महाविद्यालयात जात होतो आणि आमच्या बरोबरीने वडीलही अनेक पदव्या प्राप्त करीत होते. म्हणजे घरातील तिघांच्या शिक्षणाची आणि पर्यायाने सर्व घर आणि पाहुणेरावळे यांची उठबस पाहण्याची सर्व जबाबदारी आईवरच पडे. पाहुण्यांचा आदरसत्कार ती अगत्याने करीत असे.

सासर-माहेरचे गणगोत तिच्याभोवती सततच असते. माझ्या वडलांजवळ कोणी मनातले बोलत नसत; पण आईजवळ मात्र तिच्या सासरची मंडळी मनमोकळेपणाने बोलत असतात. अनेकांना आपले दुःख तिला सांगावेसे वाटते. घरी आलेल्या माणसाला जेवायला घातल्याशिवाय ती सोडतच नाही.

तिला लग्न जमविण्याचा एक छंद आहे. तिच्या नातेवाइकांची अनेक लग्ने तिने जमविली. लग्न झालेल्या तिच्या भाच्यांच्या मुलींसाठीही तिने स्थळे पाहिली. अनेकवेळा लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचा हा तिचा छंद मला आश्चर्यकारक वाटतो. कारण तिला महाराष्ट्रातील अनेक मंडळींची माहिती, त्यांचे नातेसंबंध हे माहीत आहेत. लांबलांबची नाती ती कशी स्मरणात ठेवते याबद्दल मला नेहमीच कुतूहल वाटते.

माझ्या शैक्षणिक आणि नंतरच्या वाटचालीत तिचा मोठा वाटा आहे. १९८४ मध्ये मी मॉडर्न महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले तेव्हा



मुलगा लहान होता. त्याला आणि दुसऱ्या मुलाला सांभाळण्याचे काम तिने प्रेमाने केले म्हणून मी बाहेरची लढाई जिंकू शकले. नोकरी सांभाळून 'स्नेहवर्धन प्रकाशना'ची १०१० पुस्तके मी प्रकाशित करू शकले याचे श्रेय तिचे आहे. तिच्या मदतीशिवाय मला काही करता आले नसते. तिने नातवांना सांभाळलेच; पण पतवंडांनाही तिचा लळा आहे. मी करीत नाही इतकी माझ्या मुलांची तिला काळजी असते. अनेकवेळा मी तिला म्हणते, ''आता तू लक्ष देऊ नकोस, मुले मोठी झाली आहेत;'' पण तिला ते पटत नाही. ''शिवजित बारीक झालाय, तो जेवत नाही, भैय्या बाहेरगावी गेलाय, त्याने फोन केला की नाही.'' असे अनेक प्रश्न तिच्याभोवती असतात. त्यांच्या भवितव्याची काळजीही ती घेत असते. जावई तिला मुलासारखेच वाटतात. माझ्याजवळ ती काही गोष्टी बोलत नाही; पण तिच्या जावयाजवळ, श्री. तावरे यांच्याजवळ अनेकदा ती मन मोकळे करीत असते.

उत्साही, चैतन्यशील असा तिचा वावर मला सततच प्रेरणादायी वाटत आला आहे. तिला फिरण्याची अतिशय आवड आहे. माझ्यापेक्षा तिनेच अधिक प्रवास केलेला आहे. नातेवाइकांमध्ये ती लोकप्रिय आहे. आजही लग्नात वा इतर कार्यक्रमात नातेवाइकांचे, ओळखीपाळखीच्या लोकांचे कोंडाळे तिच्याभोवती असते. ती एखाद्या ठिकाणी आली नाही तर सर्वजण कमाआत्या, कमामावशी, कमाआजी का आल्या नाहीत अशी चवकशी करतात.

तिचा गोरा वर्ण ब्याऐंशीव्या वर्षीही टिकून आहे. या वयातही तुमची आई सुंदर दिसते असे अनेकजण मला म्हणतात. आईवडील दोघेही दिसायला सुंदर, रुबाबदार आणि तुम्ही अशा कशा? असा प्रश्न माझ्या मैत्रिणी मला जेव्हा विचारतात तेव्हा शिवाजी महाराजांनी जे वाक्य म्हटले होते, ''अशीच असती आमुची आई, तर आम्हीही जाहलो असतो सुंदर'' हे वाक्य माझ्याबाबत का लागू पडले नाही असा प्रश्न मला नेहमीच पडतो.

मुलांच्या जडणघडणीत आई-वडलांचा मोठा सहभाग असतो. माझे आजोबा मी सहावीत असताना आईला रागावले होते, कारण काय तर त्यांनी पाहिले की, माझी आई माझ्याकडून स्वयंपाकघरातील बारीकसारीक कामे करून घेत असे. कुकर लावणे, भाजी निवडणे, ताटपाणी करणे हे त्यांना आवडत नसे. म्हणून ते तिला म्हणत, ''इतकी

हुषार मुलगी, तिला स्वयंपाक कशाला शिकवतेस. मोठी झाली की करेलच.'' पण आईचे उत्तर नेहमी असे की ''लग्न झाल्यावर माझ्या मुलीला काही येत नाही असे कोणी म्हणायला नको.'' आणि खरेच लग्न झाल्यावर माझे कधीच कोठे अडले नाही. आजही मी रोज पटकन स्वयंपाक करून महाविद्यालयात जाते किंवा गावालाही जाऊ शकते याचे कारण सर्वस्वी तिची शिकवण आहे.

प्रत्येक आईला आपल्या मुलांचे कौतुक असते तसे माझ्या आईला माझेही कौतुक आहे. माझे नवीन पुस्तक आले की मी तिला दाखवते. ती सवडीने वाचते आणि त्याबद्दलचा अभिप्रायही देत असते.

'मातृपंचक' या नावाचे एक संपादकीय पुस्तक पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तक म्हणून नेमण्यात आले. त्याची पहिली प्रत जेव्हा माझ्या हातात पडली तेव्हा मी तिच्या घरी गेले, तिच्या पाया पडले आणि प्रत हातात दिली. जणू काही समस्त मातांचा आशीर्वादच तिच्यारूपाने मला मिळाला. आजही अनेकजण या पुस्तकाबद्दल भरभरून बोलतात.

माझ्या प्रगतीत सिंहाचा वाटा कमलादेवी पंजाबराव जाधव या माझ्या आईचा आहे.

❖



## कलेतून आनंद मिळविणारी माझी आई

**डॉ. मधुरा कोरान्ने**

देवाने माणसाला सांगितले, ''माझं स्मरण केलंस की, कोणत्याही संकटाच्या वेळी मी सतत तुझ्या पाठीशी आहे.'' माणसाला प्रश्न पडला, ''देव आपल्याला कसा दिसेल?'' देव म्हणाला, ''तू कोणाच्याही आईच्या रूपात मला बघ ! मी आईच्या हृदयातच सदैव असतो!''

आपण स्वतःच आईच्या रूपात परमेश्वरालाच बघत असतो. आई असणं आणि आईचं नसणं यातील फरक आई देवाघरी गेल्यावरच जाणवतो. आईसारखं निःस्वार्थी प्रेम दुसरं कोणीही करू शकत नाही. आईच्या कुशीतील ऊब मनाला सुखावून जाते. अशीच मायेची ऊब आम्हा सर्वांना माझ्या आईने दिलीच; परंतु आपल्या हाताने बनविलेल्या स्वेटर्स, शालींमधून इतरांनाही ही ऊब दिली.

लहानपणापासूनच माझ्या आईला (सौ. मंगला कुलकर्णी) हस्तकला, विणकलेची आवड होती. लग्नानंतर ती आवड बहरत गेली. माझ्या वडलांच्या बदलीच्या नोकरीच्या निमित्ताने नाशिक, अलिबाग, सातारा इत्यादी ठिकाणी तिने छंदवर्ग घेतले आणि आपली कला इतरांना शिकवली. हस्तकला शिकणाऱ्या महिलांच्या सहकार्याने ' कलाकुंज ' या संस्थेची स्थापना केली. यातील काही गरीब महिला, धुणी-भांडी करणाऱ्या होत्या. त्यांच्याकडून फी न घेता त्यांना तिने स्वेटर्स विणायला शिकवले. आज त्या महिला ऑर्डर्स मिळवून स्वेटर्स बनवून देत आहेत. स्वतःच्या पायावर उभे राहून संसाराला हातभार लावीत आहेत.

या संदर्भात 'सौ. शुभदा जोशी' यांचा अनुभव बोलका आहे. त्या म्हणतात, ''अभिनव विद्यालयात (पुणे) माझ्या लहान नातीची शाळा सुटेपर्यंत मी थांबत असे. त्याचवेळी मंगलाताई पण त्यांच्या नातीसाठी थांबत असत. तेव्हा त्या तेथे स्वेटर्स विणत असत. मी त्यांना विचारलं, ' मला शिकवाल का हे सारं?' त्यावर त्यांनी लगेच आनंदानं होकार दिला; पण मला गेली दोन/तीन वर्षे सांधेदुखीचा त्रास होत होता. मी

त्यांना म्हटलं, ' मला शिकायची खूप इच्छा आहे. पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे मला उत्साह वाटत नाही.'' त्यावर त्या म्हणल्या, ''कामात मन गुंतवलं तर प्रकृतीच्या किरकोळ तक्रारींकडे लक्ष द्यायला वेळच मिळणार नाही.'' सुरुवातीला माझी बोटं वळत नव्हती; पण हळूहळू मंगलाताईंनी माझ्यातला आत्मविश्वास जागृत केला. आणि आज मी लोकरीचे स्वेटर्स, शाली, स्कार्फ, कानटोप्या, लहान मुलांचे कपडे बनवित आहे. याचे सर्व श्रेय अर्थातच मंगलाताईंना आहे !

बघताक्षणीच प्रेमात पडावे असे आकर्षक रंग, हातांची सफाई, डिझाइन्सची विविधता आणि कलात्मकता यांचा एकत्रित मिलाफ म्हणजे आईने विणलेले स्वेटर्स आणि शाली! लहान बाळांच्या स्वेटर्समधील डिझाइन्समध्ये विविध पक्षी, प्राणी, फळे यांच्याबरोबर आकर्षक रंगसंगतीचा समावेश असतो. अलिबाग, नाशिक, सातारा यांसारख्या निरनिराळ्या ठिकाणी भरविलेल्या प्रदर्शनांत रसिकांनी आईच्या कलेला मनपसंतीची पावती दिली आहे. त्यादृष्टीने आजवरच्या कार्याबद्दल हस्तकला प्रसारासाठीचा ' वासंती काळे स्मृती पुरस्कार, पुणे ' हा पुरस्कार तिला मिळाला आहे.

आम्ही कधीही आईकडे गेलो की, तिच्या हातात स्वेटरच्या सुया असतच. वयाची पंचाहत्तरी ओलांडली तरी तिला लोकर, सुया हातात घेतल्याशिवाय चैन पडत नसे. ''स्वेटर विणायला घेतले की, दुखण्याचा विसर पडतो,'' असे ती सतत म्हणायची ! शेवटच्या काही दिवसांत हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले तेव्हा ''स्वेटर्स विणायचे आहेत का ?'' असे विचारल्यावर तिच्या चेहऱ्यावर हसू यायचे! आज ते स्वेटर विणणारे हात थांबले आहेत. परंतु तिच्या बोटांचा कलात्मक, ऊबदार स्पर्श अनेक नातवंड, पतवंडांना त्यांनी घातलेल्या स्वेटर्समधून जाणवत आहे......खात्री आहे, त्यांनी घातलेले स्वेटर्स बघितले की, आपल्या कलेला मिळालेली ही मनपसंत पावती बघून तिचा चेहरा आनंदाने, समाधानाने उजळला असणार.....!

खरे आहे, दुसऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद बघण्यातच तिने आपले आयुष्य खर्ची घातले.......फक्त आता आम्हाला तिच्या चेहऱ्यावरील आनंद बघता येणार नाही......!

❖



## हे ऋण जन्मदेचे न फिटे

**प्रा. वंदना जोशी**

माझ्या आईचं रूप अगदी सहजपणानं, स्वाभाविकतेनं माझ्या डोळ्यांपुढे उभं राहतं. आई आता पंचाहत्तर वर्षे वयाची आहे. हीरक महोत्सवी वर्ष! आईच्या आयुष्यरूपी हिऱ्याचे तिच्या व्यक्तित्वातून चमकणारे अनेकविध तेजस्वी पैलू डोळ्यांसमोरून सरकू लागतात.

आईचा गोरा रंग, मध्यम बांधा, हसतमुख आणि सहनशीलतेचा वसा घेतलेला चेहरा डोळ्यांपुढे येतो. आणि वाटतं, या माउलीनं खरोखरच किती कष्टांतून आम्हा चौघा भावंडांना वाढवलं, शिकवलं.

माझे आईवडील दोघांनीही मुलांच्या शिक्षणाचं महत्त्व ओळखून आम्हाला त्या दृष्टीनं नेहमीच उत्तेजन दिलं. माझ्या आईचं बालपण खेड्यात गेलं. लहानपणीच तिची आई सतत आजारी असल्याने, तिचे शालेय शिक्षण तिच्या मोठ्या चुलत भावाकडे झाले. वहिनीच्या हाताखाली दिवस काढताना भरपूर कष्ट केले. घरातली कामं करण्यात बालपण संपून गेलं. सातवीपर्यंत म्हणजे 'फायनल' शिक्षणापर्यंत गाडी थांबली.

वयाच्या सोळाव्या/सतराव्या वर्षी तिचं लग्न झालं. लग्नानंतर सोळा वर्षांनी आईनं मॅट्रिकची परीक्षा मोठ्या जिद्दीनं दिली. आम्ही चारही भावंडं शाळेत जात होतो. पहाटे उठून स्वयंपाक करून आमचं आवरून आई तेव्हा क्लासला जात असे. मला आठवतं, 'स्पेशल अंकगणित' घेऊन इतक्या वर्षांच्या अंतराने परीक्षा देऊन पहिल्याच प्रयत्नात चांगले गुण मिळवून आई उत्तीर्ण झाली. हे फार मोठे यश होते. आईच्या या कष्टांचा, अभ्यासाचा फार मोठा संस्कार आमच्या बालमनावर झाला यात शंका नाही.

मध्यमवर्गीय कुटुंबाचे वातावरण आमच्या घरात होते. मी इयत्ता चौथीला असताना नाशिकला १९६९ साली मोठा पूर आला होता. गोदावरीला आलेला पूर, गंगेकाठच्या भागात सर्वत्र पाणी, झोपड्यांची

पडझड, आम्ही बघायलाही गेलो होतो. नंतर पाणी ओसरले. वर्तमानपत्रांतून बातम्या येत होत्या. आईने मला सांगितले, ''आता वार्षिक परीक्षा येईल न... महापुराबद्दल निबंध येऊ शकेल... कसा लिहिशील? पेपर वाच. लिहून काढ.'' मला आठवतं; मी थोडंफार काही लिहिलं. स्वैंपाक करता करता, पाणी भरता भरता आईनं, ''अग, तू हे पाहिलंस ना? ते लिही. त्याच्याबद्दल लिही. त्याचं वर्णन करायचं असतं.'' असे सांगून दोन-तीन पाने माझ्याकडून लिहून घेतली. नंतर ते मागं पडलं. फक्त सहा महिन्यांनी वार्षिक परीक्षेच्या वेळी मराठीच्या प्रश्नपत्रिकेत पहिलाच प्रश्न-निबंध लिहा - दहा मार्कांचा! चार विषयांपैकी एक विषय होता - 'मी पाहिलेला महापूर!' - तो विषय मी पाहिला, खूप आनंद झाला. आणि आईनं केलेलं मार्गदर्शन, तिचं बोलणं, माझं लिहिणं सारं आठवलं- झर्रकन मी छान निबंध लिहिला. खूप चांगला लिहिता आला.

चौथीच्या वर्षी चारही तुकड्यांतून मी प्रथम क्रमांकाचं बक्षीस पटकावलं. आईच्या शिकवणीचा, उत्तेजनाचा; मार्गदर्शनाचा झालेला तो मोठा उपयोग होता. तिच्या पुण्याईचं ते फळ होतं. त्यानंतरच्या पुढच्या परीक्षांमध्ये मी कधीही पहिला नंबर सोडला नाही. आईचं अभ्यासाकडे सतत लक्ष राहिलं.

मनाच्या स्मृतिपटलावर कोरलेली एक आठवण! मी सातवीत असताना जिल्हास्तरावरची एक निबंधस्पर्धा! 'एक दक्ष आणि आदर्श माता जिजाऊ!' निफाडच्या शाळेत जाऊन दोन तास बसून निबंध लिहायचा होता. आईनंही शिवाजी-जिजामातेच्या गोष्टी सांगितल्या होत्याच. शाळेतल्या कुलकर्णी बाईंचं मार्गदर्शन होतं. मी निबंध स्पर्धेत निबंध लिहून आले. नंतर एक दिवस नाशिकच्या 'गावकरीत' माझं नाव छापून आलं. प्रथम क्रमांकाचं १५१/-रुपयांचं पारितोषिक निबंध स्पर्धेचं मला मिळालं होतं! मला अजूनही आठवतं, आई ते वर्तमानपत्र तसेच घेऊन शेजारच्या काकूंकडे गेली. ''अहो काकू, आपल्या माधुरीचं नाव आलंय् पेपरमध्ये! निफाडला जाऊन बक्षिस मिळवलं!'' - किती आनंदाने अभिमानानं तिचा चेहरा ओसंडून वाहत होता! त्याकाळी पेपरमध्ये नाव येणं हे तिच्या दृष्टीने मोठं कौतुक होते. त्यानंतर अनेकदा बक्षिसं मिळाली. वेगवेगळ्या कारणांनी पेपरमधून असं कौतुकही झालं; पण तो क्षण नेहमीच आठवतो.

माझे वडील सरकारी ऑफिसमध्ये पोस्टात काम करत होते. आर्थिक परिस्थिती नाजूक असतानाही दोघांनीही आल्यागेल्यांचे आतिथ्य मनापासून



केले. आमचे घर गावात, बाजाराच्या गल्लीतच असल्यामुळे सतत पाहुणे यायचे. आईने सदैव हसतमुखाने 'अतिथी देवो भव!' म्हणून साऱ्यांचे चहा-फराळ, जेवण सगळं केलं. आतासुद्धा कधी आठवलं, तर मन थक्क होतं. कुठून यायचं बळ हिला?

अलीकडच्या काळात घरं मोठी; पण माणसांची मनं लहान झालीयेत असं म्हणतात; पण आमच्या घरी मात्र अनुभव हा-घर छोटं होतं. पण माणसं सदैव येत जात असत. हा संस्कार नकळत आमच्यावरही होत राहिला आहे. हे फार मोठं ऋण आहे.

मी स्वत: 'आई' झाले आणि मग बाळाचे करताना जसा माझा जीव गुंतू लागला तेव्हा तर मला खरंच 'आईचं मन' काय असतं? हे अगदी 'या हृदयीचे त्या हृदयी घातले' इतक्या संवेदनशीलतेने समजले.

आईचा जीव नेहमीच तिच्या मुलाबाळांमध्ये गुंतलेला असतो. तिला त्याची काळजी वाटते. कधी रागवली, बोलली तरी तिच्या काळजात मायेचा, वात्सल्याचा झरा वाहत असतो...... हे अंतर्मनात स्पर्शत राहिले.

अशी माझी आई माहेरची जनाबाई तर सासरची मंगला - साऱ्यांचं मंगल चिंतणारी, आम्हा भावंडांना अभ्यासाचे महत्त्व सांगणारी. घरातील काम करणारी, सदैव व्यापात गुरफटलेली; पण चेहऱ्यावर हास्याची रेषा सदैव उमटवलेली अशी! आता वयानं जरी थकली तरी मनानं अतिशय उत्साही आहे. देवाधर्मांचं करताना तर ती अधिकच तरतरीत दिसते.

तिच्या शिकवणुकीचा खूप मोठा संस्कार आम्हाला मिळाला. या संस्कार शिदोरीमुळेच आमच्या आयुष्याची वाटचाल अतिशय सुकर झाली. हेच खरं! म्हणूनच म्हणावेसं वाटतं-

''आई, आम्हां सर्वांना तू खूप खूप हवी आहेस! तू अगदी निरोगी, आरोग्यसंपन्न आणि अशीच आनंदी राहा !''

या साऱ्या भावना प्रेमाने मनात उचंबळून येत असताना एकच भाव रेंगाळतो आहे. तो म्हणजे - 'हे ऋण जन्मदेचे न फिटे !'

❖

## माझी शिस्तप्रिय आई

**डॉ. वैजयंतीमाला जाधव-भोसले**

'माझी आई' म्हटले की मनामध्ये वेगवेगळ्या स्वरूपाच्या भावना दाटून येतात. आईविषयी किती सांगावे तितके थोडेच आहे असे वाटते. माझ्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा कोणाचा असेल तर तो अर्थातच माझ्या आईचा! आमच्या तीनही बहिणींचं आईने पालनपोषण केले नाही तर तिने आम्हाला घडवले; आमच्यावर सुसंस्कार केले. प्रसंगी अतिलाड न करता शिस्त लावली.

मुळातच माझी आई ही अतिशय शिस्तप्रिय व्यक्ती आहे. लहानपणापासून तिने मला चांगल्या सवयी लावल्या. लवकर उठण्याची गोष्ट असो की नीटनेटके राहण्याची सवय असो हे आईचे अनुकरण करत आम्ही शिकत गेलो. आई कशी बोलते, कशी कष्ट करते, या गोष्टी अर्थातच मुलं अनुकरणातून शिकतात. आम्ही त्याला अपवाद नव्हतो. नोकरी आणि कुटुंब सांभाळत असताना इतर अनेक व्यवधानं तिला होती.

गोखले महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ती नोकरी करते. गेली अनेक वर्षे मी तिला ही नोकरी करताना पाहिले आहे. त्यात ती खरंच समरसून गेली आहे. ग्रंथालयात कोणतीही पुस्तकं येवो, मासिकं येवो ती नेहमी त्याविषयी मला सांगायची. तिच्याजवळ राहत असताना मी अनेकदा ती वाचली आहेत. महाविद्यालयाशी तिचे अनुबंध खूपच घट्ट आहेत. आपल्या कामाशी प्रामाणिक आणि एकनिष्ठ राहण्याचा धडा मी तिच्याकडून घेतला. पूर्वी ती मासिकांतून, वर्तमानपत्रांतून लेखन करीत असे. तिच्या वाचन आणि लेखनाच्या सवयीचे अनुकरण करत मीही कधी लिहू-वाचू लागले हे मला कळलेच नाही. माझं पीएच.डी.चं काम चालू असताना अनेकदा काही कारणांनी ते रेंगाळायचं; त्यावेळी आई प्रोत्साहन द्यायची. केवळ तिच्या प्रोत्साहनामुळे, तिने उंचावलेल्या मनोबलामुळे मी पीएच.डी. करू शकले.

वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात व्यक्तिमत्त्वाचा आमचा जो



विकास झाला त्यात आईचा सिंहाचा वाटा आहे. आम्ही तीनही बहिणींची जबाबदारी तिने आयुष्यभर एकटीने समर्थपणे पेलली. स्वावलंबनाने आयुष्य कसे जगावे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे 'माझी आई.' आजच्या गुंतागुंतीच्या जगण्यात हा स्वावलंबनाचा धडा आम्ही तिघी बहिणी कधीच विसरलो नाही. आईपासून अनेक लहान-सहान गोष्टी आम्ही शिकत गेलो. आपल्या मुलींनी स्वत:चे चांगले करिअर करावे म्हणून ती रात्रंदिवस झटत राहिली. आम्हाला 'मुलगी' म्हणून कोणतंही क्षेत्र तिने वर्ज्य केलं नाही. माझ्या दोन्ही बहिणींनी ज्युदो-कराटेचं उत्तम प्रशिक्षण घेतलं आहे. या जगात कोणतीच गोष्ट अवघड नाही, हे ती सतत सांगत असते.

आम्ही शाळेमध्ये असताना ती आमच्यासोबत शाळेत कधीच आली नाही. की तिने आपल्या मुलींची प्रगती कशी आहे हे शिक्षकांना कधी खोदून खोदून विचारले नाही; पण आमच्या नकळत आम्ही कसा अभ्यास करतो यावर तिचे बारीक लक्ष होतं. आमच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास हा आईच्या शिकवणीमुळेच झाला. ती स्वत: निर्भय व्यक्तिमत्त्वाची आहेच; पण आम्हालाही तिने तसं बनवलं. 'वाघालाही दोरीनं बांधून आणता आलं पाहिजे.' हे तिचं वाक्य लहानपणी विनोदी वाटायचं; पण आज त्याचं महत्त्व कळत आहे. तिच्याकडे लायसन्स असलेली बारा बोअरची बंदूक आहे. आपल्या आईकडे इतके सगळं धैर्य कुठून आलं असेल याचं मलाही कधी कधी आश्चर्य वाटतं; पण अनेक खडतर प्रसंगांनीच तिला खंबीर बनवलं आहे.

आयुष्यामध्ये अनेक कठीण प्रसंगांना तिने धीराने तोंड दिले. त्यामध्ये ती कधीच खचून गेली नाही. स्वत:च्या आजारपणांमध्ये ती कधी झोपून राहिलेली मी तिला पाहिलं नाही. आम्हा तीनही बहिणींची लग्ने होऊन आम्ही पुण्यात स्थायिक झालो. त्यामुळे तिनेही पुण्यात राहायला यावे हा आमचा आग्रह असतो; पण नोकरी अर्धवट सोडायची नाही हा तिचा बाणा तिला येथे राहू देत नाही. मी जेव्हा पुण्यामध्ये येते तेव्हाही ती आम्ही काय करतो; नोकरी-व्यवसाय कसा चालला आहे, त्यामध्ये अजून प्रगती कशी करता येईल, याविषयी आमच्याशी चर्चा करते. 'आई' म्हणून मुलींविषयीची तिची काळजीही यातून डोकावते. ती मितभाषी आहे आणि अनोळखी व्यक्तींशी किंवा नातेवाइकांशी ती खूप कमी बोलते. आईबद्दल एक आवर्जून सांगण्याची गोष्ट म्हणजे ती खूप 'सोशल' आहे. लहानपणापासून मला आठवते आम्हा तिघींचा वाढदिवस असो किंवा

घरात कुणाची पुण्यतिथी असो ती सामाजिक संस्थांना नेहमी मदत करते. आमच्या वाढदिवसादिवशी अंध शाळेतील मुलांना नेहमी ती नाश्ता देत असे. वडलांच्या पुण्यतिथीला वृद्धाश्रमात, बालकल्याण, अनाथ संकुलात ती जेवण देते. 'दान' नेहमी सत्पात्री असावं असा तिचा आग्रह असतो.

माणसाच्या जडणघडणीत त्याच्या कुटुंबीयांचा वाटा मोठा असतो. माझी आई हे एक कुटुंबच आहे; त्यामुळे आमची जडणघडण झाली. आम्हाला स्वतंत्र विचार करायला लावणारी, स्वावलंबनाचा पाठ घालून देणारी, प्रसंगी कणखर तर प्रसंगी हळवी होणारी माझी आई एक उत्तम व्यवस्थापिकाही आहे. घरातील सर्व कामांचं व्यवस्थापनही ती अतिशय उत्तमरित्या करते. घरात अचानक एखादी वस्तू, पदार्थ संपला आणि त्याविना आईचं काम अडलं असं झालेलं मी कधीच पाहिलं नाही. सर्व गोष्टींचं नियोजन ती वेळेआधीच करून ठेवते. मी घरात सर्वांत लहान असल्यामुळं ती माझ्याबाबत खूप भावुक होते. लग्न झाल्यानंतर मी पुण्यात स्थायिक झाले. मॉडर्न महाविद्यालयात काम करू लागले. याठिकाणी डॉ. स्नेहल तावरे या माझ्या विभागप्रमुख आहेत. कोल्हापूरमध्ये मॅडम गेल्यानंतर आईने त्यांची आवर्जून भेट घेतली. आपली मुलगी कोणाच्या हाताखाली काम करते हे तिला पाहयचं असणार हे मला तत्क्षणी जाणवलं. तिने त्याच संध्याकाळी मला सांगितलं की, पुण्यात तुझी काळजी करणारी अजून एक आई भेटली तुला ! माझ्या आईकडे माणसं ओळखण्याची एक विलक्षण हातोटी आहे हे मला जाणवलं. माझ्या सासूबाई या प्राथमिक शिक्षिका म्हणून निवृत्त झाल्या. तेव्हा आईने आवर्जून त्यांना फोन केला. निवृत्तीनंतर त्यांनी आराम करावा, कामाचा सर्व व्याप, धावपळ, आता तरुण पिढी करेल असा सल्ला दिला. आपली मुलगी नेहमी कार्यक्षम असावी असा यामागे तिचा हेतू असावा.

माझ्या आईविषयी अशा अनेक आठवणी सांगता येतील. विवाहा-नंतरही मला माझ्या सासुबाईंच्या रूपाने आईचं प्रेम मिळत आहे; पण मी स्वतः आईच्या भूमिकेत गेल्यानंतर 'आई' बनणं किती कठीण आहे हे जाणवलं. कुठंही गेलो तरी आपल्या पिलांपाशी आईचं लक्ष असते. आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार ती सतत करते. आमच्या मनात सतत आत्मविश्वासाची, संस्कारांची, विविध कौशल्यांची ज्योत पेटती ठेवण्याचं काम आईने केले; त्यामुळे आज माझं सगळ्यात जास्त जोडलेपण कोणाशी असेल तर ते माझ्या आईशी !

❖



# माझी सुंदर आई

**डॉ. संयोगिता नाईक**

लहानपणी शालेय जीवनात बऱ्याचदा आईवर निबंध लिहिलेला आहे. त्या बालवयात आईला समजण्यात आणि आता प्रौढ वयात आईला समजण्यात नक्कीच फरक आहे. कारण प्रौढ वयात आपण स्वतः आईची भूमिका पार पाडत असतो; त्यामुळे आई म्हणजे काय ! याची जास्त जाणीव झालेली आहे.

माझे जीवन विकसित व प्रगत झाले, यात तिचाच तर मोठा वाटा आहे. लग्नानंतर शिक्षण चालू ठेवण्यात व मुलगी झाल्यानंतरही मला एम.डी. करू देण्यात तिचा फार हातभार लागलेला आहे. आई व बाबांमुळेच मी आज मोठ्या पदावर काम करीत आहे, स्वाभिमानाने व आनंदाने जगत आहे.

आम्ही चार बहिणी; परंतु कधीच आमच्या घरात तुम्ही मुली आहात, तर हे करू नका, ते करू नका..... असं कधीच सांगण्यात आलं नाही, किंवा कधीच कमी लेखले गेले नाही..... याउलट आमचे भरपूर लाड झालेले आहेत, भरपूर स्वातंत्र्य दिले गेलेले आहे. जेव्हा मला दुसरी मुलगीच झाली तेव्हा आईनेच किती स्पष्टपणे सांगितले की काही वाईट वाटून घ्यायचे नाही.....मुलगा, मुलगी सारखेच असतात. मुलगा असायलाच पाहिजे, असे मुळीच नाही... कारण त्यावेळेस मी थोडी नाराज झाले होते... पण तिच्या या बोलण्याने मलाच माझी लाज वाटायला लागली... पण आज मी माझ्या दोन्ही मुलींबाबत फार खुश आहे. म्हणूनच आपण जेव्हा-जेव्हा 'स्त्रीभ्रूण हत्यां'बद्दल वाचतो, तेव्हा प्रथमतः त्या गोष्टींवर विश्वासच ठेवावासा वाटत नाही. खरंच असं होतं का? हा प्रश्न पडतो. कारण आमच्या घरात असल्या संतापदायक व घृणास्पद वाटतात.

माझ्या आईने आम्हा चौघी बहिणींना एवढे सक्षम बनविले आहे की, कुठल्याच गोष्टींची आम्हाला भीती वाटत नाही किंवा कुठल्याच संकटांना आम्ही घाबरत नाही... जीवन आहे... जीवनात सुख-दुःख, यश-अपयश

असणारच.....ही तिचीच शिकवण आहे; त्यामुळे जीवनातील आनंद जसा साजरा केला जातो, तसाच दुःखाचा सामनाही सहजपणे केला जातो.

माझ्या भावाला पोलिओ आहे; परंतु त्यालाही त्याच्या अधुपणाची जाणीव आम्ही कुणीच करून देत नाही. म्हणूनच अधू असूनही तो आज एक जबाबदार डॉक्टर आहे. आई-बाबांची, त्याच्या स्वतःच्या कुटुंबाची तो काळजी घेतो. चारचाकी गाडी चालवितो. एखाद्या धडधाकट माणसालाही लाजवेल असे त्याचे कार्य आहे. सगळ्यांना तो मदत करतो, माहेरची गोडी वाढवितो म्हणूनच सगळ्यांचा तो लाडका आहे..... हे सर्व माझ्या आईमुळे आहे. अशा या तिच्या संस्कारात्मक संगोपनामुळे आम्ही भावंडं स्त्री म्हणून नाही किंवा अधू म्हणून नाही तर माणूस म्हणून जगतो.

माझी आई दिसायला खरंच सुंदर आहे. गोरी-गोरी पान, घारे डोळे, उंच कपाळ..... खरंच छान आहे. माझ्या लग्नाच्या वेळेस जेव्हा अनुप जलोटांचं गाणं लागायचं.....

**''चांदी जैसा रंग है तेरा, सोने जैसे बाल...**
**एक तू ही धनवान है गोरी, बाकी सब कंगाल...''**

तेव्हा मनात म्हणायचे, ''अरे, हे गाणं तर आईलाच जास्त लागू होतेय.'' माझी आई शिक्षितही आहे. अकरावीपर्यंतचे तिचे शिक्षण पुण्यासारख्या शहरात झालेले आहे व लग्नानंतर ती चाळीसगावसारख्या छोट्या शहरात आली... मोठ्या खटल्याच्या घरात तिचं लग्न झालेलं... पण सगळं कसं तिनं छान निभावून नेलं आहे. लग्नानंतर शिक्षण झाले... शिक्षिका म्हणून नोकरी केली... नोकरी करता करता शिकवणी घ्यायची. अत्यंत कष्टात-काटकसरीत दिवस काढले; परंतु आम्हा भावंडांना कसलीच कमतरता भासू दिली नाही... नंतर तिच्या जीवनात आनंदाचे व भरभराटीचेही दिवस होते... आणि आताही आहेत... आता ती रिटायर झाली आहे... मात्र सुखी आहे. सगळी नाती तिनं जपून ठेवली आहेत, त्यामुळेच तिला सासरी-माहेरी मानसन्मान आहे. प्रत्येकजण तिला सल्ला विचारत असतो, तिची आज्ञा पाळतो... आम्हालाही हीच सवय तिने लावलेली आहे; त्यामुळे आम्ही भावंडांनीही आपआपल्या सासरची व माहेरची सगळी नाती घट्ट जपलेली आहेत. त्यामुळे वृद्धाश्रमात लोक आपल्या आई-वडलांना किंवा सासु-सासऱ्यांना ठेवतात तेव्हा वाईट वाटते... अशा अपत्यांची चीड येते... खरं तर हे ज्येष्ठ नागरिक पुढच्या पिढीला संस्कारित करण्यास व त्यांची काळजी घेण्यास फार महत्त्वाचे असतात.

❖



## माझी कृतार्थ आई

**गायत्री पंडित**
**एम.ए.**

माझे मन माझ्या आईपर्यंत कसे पोहोचले माझे मलाच कळले नाही. शांत स्वभावाच्या माझ्या आईची प्रतिक्रिया तीव्र होई, ती केवळ वावगी गोष्ट घडण्याची शक्यता वाटली तरच ! त्यामुळे वावग्या कोणत्याही गोष्टीचे वावडेच होते. हेच वावडे आज आम्हा सर्व भावंडांत प्रकर्षाने दिसून येते. मला खेळ, गाणे, नाट्य, नृत्य अशाही गोष्टींमध्ये रस होता. अनेक लोकांशी संपर्क येत असे. मी एकटीच असताना आई मला म्हणाली, ''आपलं घर, घराणं, गावातील नावलौकिक याची जाणीव ठेवायला हवी.'' ''एवढ्या एकाच वाक्यावरून हा नावलौकिक मी वाढवला पाहिजे; जपला पाहिजे, याचे भान आले. या लौकिकाला साजेल असेच वागले पाहिजे, वावगे वागायचे नाही यावर शिक्कामोर्तब झाले. कोणताही पदार्थ करताना तो खायला आणि दिसायलाही चांगला झाला पाहिजे हा तिचा कटाक्ष होता. भाकरी गोल, पातळ, पूर्ण फुगलेली झाली पाहिजे, पोळीमध्ये पुरण पूर्णपणे कडेपर्यंत गेले पाहिजे. हे अन्न कोण खातो, यापेक्षा ते आपण कसे बनवतो, याकडे तिचे लक्ष असे.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न.' हा मंत्र तिने प्रत्येक कृतीतून दाखवला; त्यामुळे प्रत्येक कृती चांगली व्हावी, ती चांगली कशी होईल याकडेच माझे लक्ष असते. एकदा कृती चांगली झाली की, त्या ठिकाणचा आपला सहभाग संपतो. त्याचे फळ काय मिळणार, चांगले मिळणार का, किंवा केव्हा मिळणार, या सर्व प्रश्नांपेक्षा ती कृती करण्याचा आनंदच अधिक असतो. तो आनंद उपाधिरहित असतो; त्यामुळेच तो निर्भेळ असतो.

दुजाभाव न करणे हा तिच्या अनेक सदुणांतील एक गुण. माझ्या आत्या असोत, आम्ही भावंडे असोत किंवा एखादा पै-पाहुणा नातेवाईक असो सर्वांशी तिचे स्नेहाचे संबंध होते. कोणाची वहिनी, कोणाची काकू, आम्हा मुलांची आई, माझ्या आजीची सून, अशी सर्व नाती तिने मोठ्या

प्रेमाने, स्नेहाने सांभाळली. अर्थातच त्यामुळे नातेवाईक व संबंधित लोकांच्या मनात तिच्याबद्दल आदर, प्रेम आजही अतिशय आहे. ''तुझी आई ना देवी होती,'' असेच उद्‌गार प्रत्येकाच्या तोंडी असतात. अशा आईची आपण मुलगी आहोत, याचा अभिमान वाटतो. तोंडी शब्दातून प्रत्येक आई-वडील आपल्या मुलांना चांगलेच सांगतात. माझ्या आईचा वेगळेपणा हाच की, ती प्रत्येक गोष्ट आपल्या कृतीतून सांगत असे, दाखवत असे.

केतकी गोरा वर्ण, सरळ नाक, रेखीव भुवया, लांबसडक काळेभोर केस, चेहऱ्यावर शांत, प्रेमळ समाधानी हास्य अशा माझ्या आईला जे कोणी भेटत, त्यांना ती आपली सुहृदय वाटत असे. आपल्या मनीचे गुज ते आईजवळ मोकळे करत असत. घरच्या नोकरांपासून ते नातेवाइकांपर्यंत सर्वांच्या मनात तिच्याबद्दल आपुलकी होती. तिच्याही मनात त्यांच्याबद्दल आपलेपणा होता; त्यामुळे अनेक नातेवाईक मोठ्या प्रेमाने आमच्या घरी येत असत व पाहुणचार घेत असत. हा दृष्टिकोण, हाच आदर्श माझ्यापुढे आजही आहे. यातूनच माणसे जोडली जातात.

माझ्या आईने माझ्या वडलांना सर्व प्रसंगांत सावलीसारखी साथ दिली. वडलांनी व्यवसाय सुरू केला. शेती व व्यवसाय दोन्ही बाजू वडलांना एकट्यांना पाहयला लागत. अशा वेळी व्यवसायानिमित्त येणाऱ्यांचीही व्यवस्था पाहणे, आम्हा मुलांचे पाहणे तिने समर्थपणे पेलले.

घुगऱ्या नावाचा बैल होता. तिचे त्याच्यावर खूप प्रेम होते. त्याला वैरण, पाणी दिले का? इतर जनावरांनाही व्यवस्थित दिले का? यावर तिचे लक्ष असे. अगदी लांबून 'घुगऱ्या' अशी हाक दिली की, तो जोरात हंबरून प्रतिसाद देत असे. तिचे प्राण्यांवरही प्रेम होते.

प्रत्येकाला आपलीच आई आदर्श वाटते. ती इतरांपेक्षा वेगळी कशी आहे, हे सांगण्याची इच्छा असते; पण खरेच माझी आई अशीच होती. सहा वर्षांपूर्वी ती आम्हा सर्वांना सोडून गेली आणि एक मोठी पोकळी निर्माण झाली. कधीच भरून न निघणारी ! आजही कोल्हापूरजवळच्या निपाणी गावात श्री. बाळासाहेब सोलापूरकर यांची पत्नी आणि माझी आई सकलसंपन्न सौ. मंगलादेवी सोलापूरकर सर्वांना वंदनीय वाटते. हीच तिच्या जगण्यातील कृतार्थता !

❖



## माझी आई – 'सरसवती'

केसरीनाथ न. काकडे
एम.ए.

आमचं कुटुंब बडोद्यातलं. बालपणीच्या धूसर आठवणीतलं. माझ्या आईचं नाव कोंडुबाई. पुढे जासुद मोहल्ल्यात ब्राह्मण आळीत राहायला आल्यावर तिचं नाव झालं कोंड्याबाई. मी मराठी चौथी पास झाल्यावर वडलांनी माझं नाव घातलं महाराणी चिमणाबाई एम. सी. हायस्कूलमध्ये इंग्रजी पहिलीत. आताची पाचवी. त्यात लिहलं होतं – आईचं नाव सरस्वतीबाई. मी वडलांना त्याबाबत विचारलं तर म्हणाले की हा तुझा जन्मदाखला आहे. पण माझ्या आईचं नाव तर कोंड्याबाई. त्यावर ते एवढंच म्हणाले की सरस्वतीबाईसुद्धा तिचंच नाव. मी गोंधळलो. पुढे मी काही प्रश्न विचारू नये म्हणून कदाचित वडील म्हणाले की, ते सर्व तुला मोठा झाल्यावर समजेल.

हायस्कूलमध्ये शिकत असताना मित्रांसोबत बडोद्याच्या प्रसिद्ध मध्यवर्ती ग्रंथालयात जाऊ लागलो. तिथे लहान मुलांसाठी स्वतंत्र बालविभाग होता. तिथे पुस्तके तर होतीच; पण मुलांना तिथेच बसून खेळण्यासाठी खूप सारी खेळणीपण असायची. छोटी-छोटी टेबलं, छोट्या छोट्या खुर्च्या; छोटे कॅरमबोर्ड्स् इ. सारं छान मांडलेलं असायचं. बालविभागाच्या बाई त्यावेळी शाळेत व इतरत्रही बाई 'मॅडम' झाल्या नव्हत्या. स्वभावानं फार प्रेमळ होत्या. खूप मजा वाटायची. तिथे आनंदाने मन रमायचं. पुस्तकं वाचायला घरी नेता यायची. एकावेळी एकच पुस्तक. घरी पुस्तकं आणल्यावर आईला खूप उत्सुकता वाटायची. तिला मी पुस्तक वाचून दाखवलं की काही खाऊ मिळायचा. एकदा 'बालरामायण' हे पुस्तक आणलं. आईने त्यातल्या चित्रांवरून ओळखलं; कारण ती निरक्षर होती. बालरामायण पुस्तकाचं वाचन तिच्यासमोर केलं. तिला खूप आनंद वाटला. त्यानंतर बालमहाभारत, ध्रुव, प्रल्हाद, इ. पुस्तकांच्या श्रवणाने ती तृप्त झाल्याचं मला जाणवू लागलं.

एकदा मी तिला सहज विचारलं की आई तू का शिकली नाहीस? तू स्वत:च वाचू शकली असती. टचकन् तिचे डोळे पाणावले. तेव्हाच म्हणाली की "तू मोठा झाल्यावर तुला समजेल; पण तू मात्र खूप अभ्यास कर. खूप मोठा हो."

वर्षांमागून वर्षे गेली. आम्ही भावंडं उत्तम प्रकारे शिकून मार्गाला लागलो. आमची लग्नकार्ये पार पडली होती आणि निवृत्तीनंतर वडील चार-पाच वर्षांत निवर्तले, तेव्हाना आईसुद्धा व्याधीमुळे कृश झाली होती. तिला क्षय झाला होता. वडील गेल्यानंतर वारसाई हक्काप्रमाणे पत्र मिळण्यासाठी बऱ्याच कागदांवर आईच्या सह्या लागणार होत्या. वडील निवृत्त झाले त्या खात्याकडूनही काही येणी मिळायची होती. आम्ही आईला त्या कागदावर डाव्या हाताच्या अंगठ्याची निशाणी देण्याचे सुचविले. तर मी वेडीवाकडी झाली तरी सहीच करेन. आम्हा सर्वांना आश्चर्य वाटलं. तिने कोऱ्या कागदावर लिहून दाखवलं, 'सरसवती'.

आणखी विचारल्यावर कळलं की माझ्या छोट्या पुतण्याच्या, तिच्या नातवाच्या बालपोथीतून तिने नातवाकडूनच अक्षर ओळख घेतली होती. तो नुकताच शिशुमंदिरात जात होता. मात्र आईला जोडाक्षरांची जणू भीती वाटायची. आम्ही खूप प्रयत्न केले; पण ती म्हणाली की "बाबांनो, आता फार उशीर झाला आहे. मी अशीच सरळ साधी सोपी सही करणार. फार फार वाईट वाटले; आम्ही एवढे शिकलो-नव्हे आई-वडलांनी आम्हाला एवढे शिकवले तेही त्यांची गरीब परिस्थिती असूनही आणि आम्ही काही आईला साक्षर करू शकलो नाही याचे."

आणखी दोन-तीन वर्षांनी माझ्या आईला पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनाची इच्छा झाली. मला तिनं दबक्या आवाजात थोडं भीत भीतच सांगितलं. मी चटकन हो म्हटलं. आमच्या फॅमिली डॉक्टरांना भेटून त्यांचा सल्ला घेतला. त्यांनीही प्रोत्साहन दिले. दोन महिने पुरतील एवढी औषधे दिली. त्याबद्दल नीट समजावले. शिवाय त्यांच्या लेटरहेडवर आईची थोडक्यात मेडिकल हिस्ट्रीशिट लिहून दिली; कारण प्रवासात कोणा डॉक्टरांची मदत घ्यावी लागली तर त्याचा उपयोग होईल. केवळ औषधांमुळेच नाही तर त्यांच्या जबर इच्छाशक्तीमुळे त्या प्रवासाची दगदग सहन करू शकतील असं डॉक्टरांनी ठामपणे सांगितलं.

वृद्ध व कृश आई, माझी पत्नी व दोन लहान मुले असा सहकुटुंब प्रवास. पुणे, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यातील सर्व प्रसिद्ध तीर्थक्षेत्रे व



ऐतिहासिक स्थळांना भेट दिली. पंढरपूरच्या विठ्ठलाचे मनभरेस्तो आईने दर्शन घेतले. तिला व आम्हालाही कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. आणि आम्ही नाशिकला आलो. मुक्काम एका लॉजवर होता. तिथे देवळालीला बँक मॅनेजर असलेले आमचे नातेवाईक मित्र भेटायला आले आणि आग्रहपूर्वक त्यांच्या घरी देवळालीला घेऊन गेले. माझ्या आईने त्यांना भगूर गावाबद्दल विचारले. इथून अगदीच जवळ असून टांग्याने भगूरला जाता येईल असे कळले. आता आईने भगूरला जायचा आग्रह धरला. आम्ही भगूरला गेलो; पण मला काहीच कळेना की तिला भगूरला जायची इच्छा का व्हावी? ती तर कधी बडोदं सोडून बाहेर गेल्याचं मला आठवतं नव्हतं. मला मात्र भगूर हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचं जन्मस्थान असल्याचं माहीत होतं.

भगुरला पोहोचताच आईने टांगेवाल्याला देवीच्या देवळात ने असं सांगितलं. देवळात देवीचं दर्शन घेतलं. तिची खणानारळानी ओटी भरायला आईने माझ्या पत्नीला सांगितलं. थोडावेळ देवळाच्या सभामंडपात आम्ही बसलो. आणि आईच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. मी विचारलं की, "आई बरं वाटत नाही? त्रास होतोय? गावातून डॉक्टर आणू?"

ती म्हणाली, "नाही रे लेकरा. हे माझं जन्मगाव. ह्याच देवळात आम्ही परकरी मुली लहानपणी खेळलो आहोत. त्या वेळच्या गावच्या खुणा आता नाहीत; पण देऊळ मात्र तसंच आहे." आणि तिने अश्रू नयनांनी तिची कहाणी सांगितली.

तिचे वडील देवळालीत मिलिटरीत रखवालदार म्हणून कामाला होते. तिथे गोऱ्या सोजिराने अपमान करून शिवीगाळ केली तेव्हा त्यांनी सोजिराची बंदूक हिसकावून त्याच्यावर टाकली, झाले. एवढा गुन्हा त्यांना व त्यांच्या कुटुंबाला देशोधडीला लावणारा ठरला. रातोरात कुटुंबासह भगूर सोडले. दोन दिवसांनी बडोदे गाठले. स्वत:चे बळवंतराव मोरे हे नाव बदलून आनंदराव शेटे या नावाने बडोद्यात राहू लागले. कदाचित पकड वॉरंटमुळे एकाच गावी स्थिरस्थावर होता येणार नाही म्हणून मुलांची लहान वयातच लग्ने लावून माझे आजोळचे आजोबा-आजी मोकळे झाले. मोठ्या मावशीचे लग्न अकराव्या वर्षी तर माझ्या आईचे लग्न तिच्या अवघ्या सहाव्या वर्षी झालं. त्यावेळी कन्याशाळेत पहिली किंवा दुसरीत ती शिकत असावी. लग्न ठरवताना मुलीला तुम्ही पुढे शाळा शिकू द्याल

अशी अट मात्र त्यांनी घातली होती. आई सांगतच होती. आम्ही ऐकत होतो. लग्नानंतर तिचे सासरे प्लेगने वारले आणि कुटुंबाची सर्व जबाबदारीच माझ्या वडलांच्या आईवर आल्याने तिला अर्थार्जनासाठी घराबाहेर पडावे लागले. माझे वडील हायस्कूलमध्ये शिकत असताना नोकरी करीत. ते मॅट्रिकपर्यंत शिकले. अशा रामरगाड्यात आईचं शिक्षण होऊ शकलं नाही. मात्र वडलांनी तिचं नाव सरस्वती ठेवलं. ही सारी कहाणी आईने आम्हाला तिच्या जन्मगावी भगूर येथे सांगितली.

नाशिक, औरंगाबाद, जळगाव असा प्रवास करत मध्यप्रदेशमध्ये ओंकारेश्वर, महेश्वर, इंदोर उज्जैनचा महाकाळेश्वर असा प्रवास आटोपून आम्ही सुखरूप बडोद्याला पोहचलो. आईच्या प्रबळ शक्तीमुळेच हे साध्य झाले.

त्यानंतर वर्षानेच माझी आई शांतपणे, तृप्त मनाने देवाघरी गेली. तिला, आम्ही तिची मुले उच्चविद्याविभूषित होऊनही साक्षर करू शकलो नाही याची सल हृदयात खोलवर कायमच राहील. आजही देवी सरस्वतीच्या फोटोसमोर मी नमस्काराला उभा राहतो तेव्हा सरस्वती देवीच्या नेत्रांमधून माझी आईच माझ्याकडे पाहते आहे; असे जाणवते. असा भास होतो.. अशी माझी आई– सरसवती...

❖



## माझी आदर्श आई

**अनुराधा मोहरे**
**एम.ए.**

'आई' या शब्दामध्ये संपूर्ण विश्वाला सामावून घेण्याची ताकद आहे. आई म्हणजे जननी, जन्म देणारी माय. आईपुढे सर्व काही फिके पडते. आपल्याला या सुंदर जगात आणणारी आईच. जेवढे प्रेम-माया आपल्याला आई देते, एवढे प्रेम कोणीही देऊ शकत नाही. म्हणजेच आईच्या प्रेमाची बरोबरी कोणीच करू शकत नाही. आईच असते जी आपल्याला चांगले संस्कार देत मोठे करते. आपल्याला थोडे जरी लागले तरी दुःख मात्र आपल्यापेक्षा जास्त आपल्या आईला होते.

तिची माया कधी आटत नाही. अगदी आपल्या कुपुत्रालाही ती विटत नाही. आपल्या मायेचा पदर सतत आपल्या मुलांच्या डोक्यावर असतो. कोणीही कधीही अडचणीमध्ये असले तरी प्रथम त्याच्या तोंडी 'आई' हाच शब्द ऐकण्यास मिळतो. लहान मूलही कुठे लागलं तर पहिल्यांदा आई असाच ओरडतो. आईबद्दल बोलावं तेवढं कमीच आहे. प्रत्येक आईला असेच वाटते की माझ्या मुलांवर कधीच संकट येऊ नये. आणि जरी आले तरी त्या संकटाला पहिल्यांदा तीच सामोरी जाते.

माझी आईही अगदी अशीच आहे. जशी प्रत्येकाला आपली आई प्रिय असते, तशीच मलाही माझी आई प्रिय आहे. माझ्या आयुष्यात माझ्या आईचे स्थान फार मोठे आहे. आज सर्वांत जास्त आदर, प्रेम असेल ते माझ्या आईचेच; पण हेदेखील खरे आहे की, मी ते तिला आजपर्यंत कधी बोलू शकले नाही. आज मी जी काही आहे, ती माझ्या आईमुळेच. आज माझ्या आईमुळे मी या सुंदर जगात आहे. माझ्या आईमुळेच माझं शिक्षण होऊ शकलं. माझ्या आईचा हात माझ्या पाठीवर नसता तर माझं एवढं शिक्षण झालंच नसतं. भलेही तो हात शिक्षेसाठी उगारलेला असो वा शाब्बासकीसाठी. आई ही माझ्या भल्यासाठी कधी कठोरही वागते तर कधी प्रेमानेही वागते. तिच्यामुळे माझ्या अस्तित्वाला

अर्थ मिळाला. मी माझ्या लहानपणापासून पाहते की, माझ्या आईच्या मनात कुठेतरी एक गोष्ट नेहमी सलत असते, की तिला सातवीनंतरचे तिचं शिक्षण पूर्ण करता आलं नाही. तिच्या बोलण्यातून नेहमी तिचं ते दुःख मला जाणवत असे. तिची इच्छा आहे की, तिचं स्वप्न मी पूर्ण करावं. शिक्षण पूर्ण करून चांगल्या ठिकाणी नोकरी करावी. आणि मानानं जगावं. माझी आई ही शाळेत असताना फार हुशार असावी हे तिच्या बोलण्यातून कळते. मी टी. वाय. ला असताना माझा पहिला नंबर एका गुणामुळे चुकला. मला फार वाईट वाटलं; पण आईने मला समजावलं. आता गेलेली वेळ परत येणार नाही. पुन्हा जिद्दीने अभ्यासाला सुरुवात कर. एवढ्यात हार मानायची नाही. माझी आई ही माझ्यासाठी एक आदर्श आहे. माझी आई मला नेहमी म्हणते की, तू किती नशीबवान आहेस की, तू पुण्यासारख्या शहरी ठिकाणी शिकतेस. गावाकडची मुले-मुली बघ त्यांना अर्धवट शिक्षण सोडावे लागते. नाहीतर दूरपर्यंत पायपीट करावी लागते. माझ्या आईने माझ्या शिक्षणासाठी फार कष्ट सोसलेत; पण मीही तिला कधी निराश होऊ देणार नाही.

आई ही दुधावरची साय आहे. आई ही तळपत्या उन्हात एक सावली आहे. आई, आई म्हणजे वेदनेनंतरची सर्वांत पहिली आरोळी आहे. आई ही एक प्रेमळ, सुखद भावना आहे. एकवेळेला संपूर्ण जग आपल्याला विसरेल; परंतु आई कधीही आपल्या मुलाला किंवा मुलीला विसरत नाही.

❖



## आई म्हणजे मंदिराचा कळस

**नीलिमा मधे**
**एम.ए.**

आजचे माझे यश पूर्णपणे माझ्या आईमुळेच आहे. आयुष्यात मला तसं कुठलं अस्तित्वच नव्हतं; पण ते मला माझ्या आईने दिलं. मी एक मातीचा गोळा होते. पण त्याला आकार माझ्या आईच्या मायेने दिला. मी कोण होते? कशी होते? मला कधीच कळत नव्हते; पण माझ्या अस्तित्वाला अर्थ मिळाला, तो माझ्या आईमुळेच.

मी लहान असल्यापासून माझ्या आईने केलेले कष्ट पाहत आलेली आहे. माझ्या आईने स्वतः कष्ट सोसून मला वाढवलं आहे. तर कधी मायेच्या ममतेने रागवलं; पण ते भल्यासाठीच. माझ्या स्वप्नांना आकार देऊन तिने आमच्या आशा-आकांक्षांना उजाळा दिलेला आहे. तिचे उपकार अनंत आहेत. ते या जन्मातही फिटणार नाहीत. तिच्यामुळे जुळलेली नाती ही सात जन्मांत कधी तुटणार नाहीत. माणसाशी कसं वागावं? कसं बोलावं? हे आम्हाला तिच्या संस्कारांमुळेच कळाले आणि तसेच मला दुनियेत जगण्याचं बळही तिच्यामुळेच मिळालं.

माझी आई ही माझ्यासाठी एक आदर्श आहे. कारण माझी आई आम्हाला नेहमी म्हणते, पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आहे. आणि तुम्ही खूप नशिबवान आहात. तुम्ही पुण्यात शिक्षण घेताय. माझे आई-वडील फार जास्त शिकलेले नाहीत; परंतु आम्ही खूप शिकावं अशी त्यांची इच्छा आहे. त्यांनी आम्हाला शिक्षणासाठी काय लागेल ते आम्हास पुरवत राहिले. आईने नेहमी आमच्या शिक्षणाकडे व आरोग्याकडे लक्ष दिले आहे. तिने आमच्यासाठी खूप काबाडकष्ट घेतले आहेत. माझी आई मला खूप आवडते.

जिजाऊमातेने शिवाजी महाराजांना स्वराज्याची प्रेरणा दिली. महात्मा गांधींच्या मनात सत्याचा आग्रह त्यांच्या मातेने ठसवला. भूदानाची कल्पना विनोबांना सुचली ती आईच्याच शिकवणुकीतून. विनोबांची आई

म्हणे, ''विन्या, आपल्याजवळ पाच घास असतील तर त्यातील एक तरी घास दुसऱ्याला द्यावा.''

आई हा थोर गुरू आहे. म्हणून तर बापूजी म्हणत, ''एक आई शंभर गुरूंहूनही श्रेष्ठ आहे.'' आजच्या काळातला दहशतवाद, भ्रष्टाचार या गोष्टींविषयी बोलत असताना आई म्हणाली, ''प्रत्येकाने लक्षात ठेवावे की प्रत्येकालाच असते आई.'' खरंच एवढा विचार केला तर, हिंसकाचे हात हिंसा करताना थांबतील.''

आपली आई आपल्या आयुष्याला एक वेगळेच वळण देते आणि आपल्यावर चांगले संस्कार करते. जसे शाळा, कॉलेजात शिक्षक आपल्याला उत्तम ज्ञान देतात तसेच घरामध्ये आई आपल्याला उत्तम संस्कारही देते. ती आपल्या घरातील एक अनुभवी शिक्षक असते.

जीवन हे शेत आहे तर आई विहीर आहे. जीवन ही नौका तर आई ही किनारा आहे. जीवन ही शाखा तर आई म्हणजे पाटी आहे. आई ही आपल्या उन्हामधील सावली, पावसातील छत्री, थंडीची शाल आहे.

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस, अंगणातील पवित्र तुळस आहे. आई म्हणजे भजनात गुणगुणणारी अशी संतवाणी. आई ही संपूर्ण जगाची माय, जननी, माता, थोर गुरू, उत्तम स्त्री आहे. माझी आई ही माझ्यासाठी एक महान व आदर्श स्त्री माता आहे. आईचे उपकार अनेक आहेत. ते आपण पुढच्या जन्मापर्यंतही फेडू शकत नाही. आईने आपल्यावर केलेले प्रेम हे अपार आहे. आई ही एक प्रेमळ भावना आहे. म्हणून माझी आई मला खूप खूप आवडते.

❖



## माझी आई, माझी मैत्रीण

पल्लवी मस्तुद
एम.ए.

**''चमचमत्या चांदण्याचा कैफ अंबरात**
**हळव्याश्या ममतेचा गंध आज या उरात**
**जाईल कुठवरती वंदनीय तिचे पाय**
**माझी माय, माझी माय, माझी माय, माझी माय.''**

'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई' म्हणजे ईश्वर. खरोखरच माझ्या आईमध्ये ईश्वराचा आत्मा आहे. प्रथम दैवत मी तिला मानते आणि तिचे चरण पूजते. माझ्या आईचं नाव सुमन. अगदी नावाप्रमाणे फुलासारखी आहे. माझ्या आईला तीन मुली आणि एक मुलगा अशी आम्ही चार बहीण-भावंडे, आई-वडलांच्या छत्राखाली वाढलो. त्यांनी आम्हाला खूप प्रेम दिले. विशेषत: आमची आई आमचं सर्वस्व बनली. माझी आई अशिक्षित आहे; परंतु तिचे विचार गगनात भरारी घेणारे आहेत. तिने लहानपणापासून आमच्यावर चांगले संस्कार घडवले. जीवनात यशस्वी होण्याचे धडे तिने आम्हाला लहान वयातच दिले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे स्वकष्टाने शिकण्याची जिद्द तिने आम्हाला लावली. आणि वारंवार शिक्षणाचे फायदे सांगत राहिली. ती आम्हाला नेहमी वरच्या टोकाला पोहोचलेल्या व्यक्तींचा आदर्श दाखवी. आमचं कुटुंब शेतकरी असल्यामुळे शेतकरी जीवनात कशा परिस्थितीला तोंड द्यावे लागते ते तिने अनुभवले आणि हे जीवन आपल्या मुलींच्या वाट्याला येऊ नये म्हणून तिने येणाऱ्या कोणत्याही परिस्थितीला मात करून आम्हाला पुढे चालण्यास सांगितले.

आम्ही शाळा शिकत असताना घरातून, नातेवाइकांकडून आम्हाला, विरोध झाला; परंतु ती एकच सांगायची की इतरांपेक्षा तुमची जागा मला वेगळी दिसली पाहिजे. मुली आहेत म्हणून काय झालं. मुलीही मुलांच्या बरोबरीने नोकरी करू शकतात. तिने आम्हाला सांगितले, तुम्ही उंच भरारी घ्या. मी तुमच्या पाठीशी उभी आहे. तुमच्या पंखांना मी बळ देईल आणि

तिने आमचे पंख बळकट केले. म्हणून आज आम्ही बहिणी तिच्या आशीर्वादाने पुण्यासारख्या शहरात उच्च शिक्षण घेत आहोत. याचा तिला अभिमान आहे. आणि ती नेहमी आमचे कौतुक करते.

समाजातील बंधनाला झुगारून तिने आम्हाला शिक्षणाचा मेवा दिला. मलाच माझ्या आईचे कौतुक वाटते की, तिचे विचार एवढे उच्च कसे असतील. ती म्हणते, ''जेव्हा तुम्ही उच्चपदावर बसलेले दिसाल तेव्हा माझे जीवन सार्थक होईल.'' आईचे हे स्वप्न पूर्ण होण्यासाठी मी खूप प्रयत्न करेल. कारण तिच्या डोळ्यात आशेचे किरण आहेत. ते मी कधी बुजू देणार नाही. आईच्या आनंदामध्येच माझा आनंद आहे. कारण आमची एवढी काळजी घेणारी आणि आमच्याच भल्यासाठी स्वत:चे आयुष्य पणाला लावणारी आई मला मिळाली हे मी माझे भाग्य मानते. स्वत:चा विचार न करता ती आम्हाला पैसे पुरवत राहिली. स्वत:च्या इच्छांचा कोंडमारा तिने आमच्यासाठी केला आणि आम्ही जीवनात यशस्वी व्हावे म्हणून तिने आम्हाला बाहेर पाठविले. तिने तिचे हृदय कठोर केले. आमच्याशिवाय एक क्षणही न घालवणारी आई. आज तिची पाखरे चारही दिशेला उडत आहेत आणि त्या पाखरांची आतुरतेने ती वाट पाहत आहे. आणि तिच्यापाशी आम्ही फक्त आमच्या आठवणींची शिदोरी म्हणून पदरात आणल्या आहेत.

माझी आई माझी खास मैत्रीण आहे. आईजवळ असल्याचा आनंद खूप वेगळा वाटतो. असे वाटते की तिच्यापासून दूर राहायला नको; परंतु तिचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. तिला समाजापासून जी बोलणी ऐकायला लागली आहेत, त्याचे उत्तर द्यायचे आहे.

आम्ही शाळा शिकत असताना खूप अडचणी आल्या. कधी राहयचा प्रश्न तरी कधी पैशांचा प्रश्न; परंतु तिच्याशिवाय आम्हाला कोणाची मदत झाली नाही. तीच आमचा देव बनली आणि तिच्या प्रयत्नांना यश येवो हीच प्रार्थना मी ईश्वरचरणी करेल. आणि जन्मोजन्मी हीच आई द्यावी अशी परमेश्वराला विनंती करेन. तिची हसरी मूर्ती कायम डोळ्यांसमोर उभी राहते. आणि जवळ आल्याचा इशारा देते. तिचे जीवन सतत संकटमय, संघर्षशील राहिले; परंतु तिने माघार घेतली नाही. परिस्थितीला तोंड द्यायचे हा तिचा खेळच बनला होता. आणि आम्हाला ती सांगे, 'जीवनात संघर्ष, संकटे नसतील तर त्याला जीवन म्हणता येणारच नाही. संघर्षमय जीवन हेच खरं जीवन जगणे होय. परिस्थितीला सामोरे जाणे म्हणजेच धाडसाने जीवन जगणे होय.' परिस्थितीवर मात केली पाहिजे हीच तिची शिकवण आहे.

❖



## आई माझी 'ममता'

प्राजक्ता खाणेकर
एम.ए.

आजचे माझे यश पूर्णपणे माझ्या आईमुळेच आहे. आयुष्यात मला तसं कुठलं अस्तित्वच नव्हतं; पण ते मला माझ्या आईने दिले. मी कोण होते? कशी होते? मला काहीच कळत नव्हते; पण माझ्या अस्तित्वाला अर्थ मिळाला तो माझ्या आईमुळेच. माझ्या जीवनाला आकार देण्याचे काम माझ्या आईने केले.

मी लहान असल्यापासून माझ्या आईने केलेले कष्ट पाहत आलेली आहे. माझ्या आईने स्वत: कष्ट सोसून मला वाढवले आहे. तर कधी मायेच्या ममतेने रागवले आहे; पण ते भल्यासाठीच. माझ्या स्वप्नांना आकार देऊन तिने आमच्या आशा-आकांक्षांना उजाळा दिलेला आहे. आणि याच तिच्या मायेच्या ममतेतून तिचे उपकार अनंत आहेत. या जन्मातही फिटणार नाहीत. तिच्यामुळे जुळलेली नातीही सात जन्मात कधी तुटणार नाहीत. माणसाशी कसं वागावं, बोलावं हे आम्हाला तिच्या संस्कारामुळेच कळलं. आणि तसेच मला दुनियेत जगायचं बळही तिच्यामुळे मिळालं. मी लहान असताना माझ्या शाळेत दुसरी इयत्तेत शिकत असताना पहिला नंबर आला ते पाहून माझ्या आई-वडलांना खूप आनंद झाला. तिचे म्हणणे हे नेहमी आमच्या कल्याणासाठी असे. ती म्हणते, ''मी कमी शिकले तरी माझ्या मुला-मुलींनी खूप शिकावं आणि मोठं होऊन शिक्षक व्हावं.'' म्हणून माझी आई आम्हाला सांगते की, ज्ञानात नेहमी भर पडू द्यावी आणि शिक्षण करताना आपले ज्ञान वाढवावे म्हणून भरपूर पुस्तके वाचावीत व लक्ष केंद्रित करून अभ्यास करावा. तसेच स्पर्धांमध्ये भाग घ्यावयास ती प्रवृत्त करत असे आणि तिने चांगली पुस्तके वाचली की, ती आम्हाला आवर्जून वाचायला सांगते. माझे निर्णय मीच घेत असते. आज मी खूप मिळवलं ते माझ्या आईमुळेच आणि म्हणूनच तिच्याशिवाय जीवन व्यर्थ आहे. आईमुळेच माझ्या जीवनाला

अर्थ आहे. आईने आपल्यासाठी केलेल्या या सर्व काही गोष्टी आठवल्या की मनात येते, आईसाठी काय लिहू आणि कसे लिहू. आईसाठी पुरतील एवढे शब्द कोठेच नाही. आईवरती लिहिण्याइतपत माझे व्यक्तिमत्त्व मोठे नाही. आई ही आपल्या सर्वांची जगत्माता आहे. माझी आई हा शब्द एका अनाथाला समाधानी भावना जाणवून देणारा आहे. आईने आपल्या मुलांना जेवढे उपकार, प्रेम, वात्सल्य आणि भावनिक क्षण दिलेले आहेत, तेवढे आपण सर्व मुले आपल्या आईला देण्याचा प्रयत्न केला तरी आपल्या आईच्या प्रेमापुढे ते खूपच कमी आणि क्षुल्लक आहे. आईने प्रत्येक मुलाला सारखेच प्रेम दिलेले असते. आपली आई कधीही कोणामध्येही भेदभाव करत नाही. सगळ्यांना सारखेच वागवते आणि सगळ्यांवर सारखेच प्रेम करते.

आईने आपल्यावर केलेले प्रेम हे अपार आहे. आई-वडील ही एक प्रेमळ भावना आहे. माझी आई मला जीव लावते. एकूणच आईचे हे प्रेमळ असे भावनिक नाते आहे.

लहानपणापासून ते अगदी आतापर्यंतच्या जीवनात कधी प्रेमाने रागावणारी, तर कधी प्रेमाने जवळ घेऊन विचारपूस करणारी माझी आई माझ्या सदैव स्मरणात राहते. म्हणून एका दृष्टीने विचार करता माझी आई ही 'ममता'च आहे व तिचे उपकार हे मला आजन्म फेडता येणार नाहीत.

❖



## आई माझा गुरू

सुनील पोकरे
एम.ए.

आई माझा गुरू, आई माझे कल्पतरू. तिने मला सारे काही दिले. प्रेमळपणे बघण्यास, बोलण्यास तिनेच मला शिकवले. मनुष्यावरच नव्हे तर गायी-गुरांवर, फुलपाखरांवर, झाडा-माडांवर प्रेम करावयास तिनेच मला शिकवले. मात्र माझी आई म्हटले की, जाणीव होते ती सुगंधाची. हा सुगंध फक्त ती लावत असलेल्या अत्तराचा नसतो. तर तो सुगंध असतो, तिच्या अवघ्या व्यक्तिमत्त्वाचा. हे व्यक्तिमत्त्व इतके परिपूर्ण आहे की, माझी आई ही माझी ताकद बनली आहे. माझी विचार करण्याची शक्ती ही माझी आई आहे. माझ्या आईचा प्रांजळपणा हीच तिची मोठी ताकद आहे. आम्हा सर्व भावंडांना हीच ताकद देण्याचा प्रयत्न आईने नेहमी केला आहे. माझी आई फक्त चौथी इयत्ता शिकलेली आहे. मात्र माझ्या अभ्यासाच्या बाबतीत फारच कडक होती. परीक्षेत चांगले मार्क्स पडावेत, म्हणून सतत माझ्या अभ्यासावर लक्ष ठेवायची. मला जेव्हा चांगले मार्क्स मिळायचे त्याचे तिला फार कौतुक व्हायचे.

मी दहावीत असताना खूप आजारी पडलो. तेव्हा तिने माझी खूप काळजी घेतली. दहावीचे महत्त्वाचे वर्ष असल्यामुळे वाया जाईल काय याची तिला काळजी होती. आजारातून बरे झाल्यानंतर मी अभ्यासाची पुस्तके वाचतो की इतर पुस्तक वाचतो याकडे नेहमी लक्ष ठेवायची. तिच्या या शिस्तीमुळे मी अभ्यासात कधीच मागे पडलो नाही

व्यक्तिगत जीवनात आई मात्र खूप कडक होती. तिला बेशिस्त, पसारा अजिबात खपत नव्हता. माझ्या खोलीतल्या पसाऱ्यावरून ती मला सारखी ओरडत असायची. शेवटी ओरडून थकली की तीच आवरायची. मी म्हणायचो, "तूच ओरड आणि तूच कर." प्रसंगी ओरडायची पण मला कधी कोंडणे, मारणे अशा शिक्षा केल्या नाहीत. तिचे समजावून सांगणेच फार प्रभावी होते. अभ्यास पूर्ण कर, फालतू वेळ वाया घालवू

नको असं सतत सांगायची. ती फालतू लाड करत नसे; त्यामुळे मी स्वावलंबी बनलो.

आईने शेजारी बसून फारच कमी शिकवले असेल; पण तिच्याकडून मी इतक्या गोष्टी शिकलो की, माझे अस्तित्व म्हणजे तिचा हुंकार, आदर, प्रेम, पराकोटीची आतिथ्यशीलता याचे संस्कारही तिने अप्रत्यक्षपणे आम्हात रुजवले होते.

माझ्या आईची आतिथ्यशीलता उच्च होती आणि ती अभिरुचीसंपन्न होती. आमची घरची परिस्थिती जेव्हा चांगली नव्हती, तेव्हाही आमच्या घरातून कोणीही अतिथी जेवल्याशिवाय गेला असं कधी झालं नाही. हे करताना आईने कधीही स्वाभिमान गमावला असे झाले नाही. ज्याप्रमाणे दिवा दुसऱ्यांना प्रकाश देतो, स्वतः मात्र अंधारात राहतो; त्याचप्रमाणे माझी आईपण दुसऱ्यांना मदत करते. अडीअडचणीच्या वेळी पैशांची मदत करीत असते. लहान वयात आईने केलेले संस्कार माझ्या मनात चिरंतन आहेत. आईची माया ही निरपेक्ष असते. तिचे प्रेम अक्षम्य, अविनाशी असते. अशी ही दिलदार, प्रेमळ आई एका अपघातामुळे जगाचा निरोप घेते तेव्हा हे मातेचे छत्र हरपल्यामुळे खूप दुःख होते. शेवटी माणसाचे जीवन हे आकाशातून पडणाऱ्या पावसाच्या एका थेंबासारखे, भिंतीवरून घरंगळत जाऊन मातीत मिसळून जावा असे वाटते.

❖



## मला घडविणारी आई

रूपकुमार यादव
एम.ए.

'आई' हा शब्द कानांवर पडताच मनात आनंद व नवचैतन्य निर्माण होते.

मला घडवण्यामध्ये आणि मला समाजात आणण्यामध्ये माझ्या आईचा मोठा वाटा आहे. लहानपणापासून म्हणजे जन्माच्या तिसऱ्या दिवसापासून एक अशी घटना घडली की माझे दोन्ही डोळे उघडत नसल्यामुळे सर्व प्रथम माझी काळजी आईलाच जास्त पडली, जेव्हा डॉक्टरांकडून आईला समजले की आता याला दृष्टी येणार नाही. त्यावेळी तिची काय मानसिक अवस्था झाली असेल ते तीच जाणो. अशा दृष्टिहीन मुलाचे संगोपन कसे करावे? हा प्रश्न तिला पडला असेल. अशा परिस्थितीत वडलांपेक्षा जास्त कणखरपणे ती उभी राहिली. कारण वडील मानसिकदृष्ट्या खचून गेले होते. अशा वेळी वडलांनापण ताकद देण्याचे काम एका स्त्रीशक्तीने केले– ती म्हणजे माझी आई!

माझी आई जरी अशिक्षित असली तरी वडलांपेक्षा व्यवहारकुशल व बुद्धिमत्ता या बाबतीत कमी नाही. मी ही सृष्टी पाहावी, अशी कुटुंबाची इच्छा असताना वडलांनी जसे प्रयत्न केले, त्यापेक्षा या गोष्टी निसर्गक्रमानुसार घडतात हे आईला कळल्यामुळे मी याला नीट सांभाळणार असे आई नेहमी म्हणे. हळूहळू मी मोठा होत गेलो आणि माझ्या शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला; पण आई डगमगली नाही, दृष्टी नसताना हा जगात कसा वावरेल, शाळेत कसा जाईल याचा विचार करून तिने पावले उचलली. सकाळी शाळेत सोडायला व सायंकाळी घरी आणायला आईच यायची.

मी नववीत असतानाची गोष्ट ! आठवीपर्यंतचे शिक्षण खडकीच्या आलेगावकर शाळेत झाले. त्या शाळेत सर्व डोळस मुलांत माझा दुसरा नंबर आला; पण घरच्या परिस्थितीमुळे मी शिक्षण थांबवावे असे वडलांचे

ठाम मत होते; परंतु माझा दुसरा नंबर आल्याचा आनंद झाल्याने मी शिक्षण पुढे चालू ठेवावे असे तिला वाटत होते; पण परिस्थितीमुळे आई-वडलांचे सतत वाद होत असताना, शिकायची इच्छा असल्याने वडलांची नाराजी पत्करून आईने मला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. याचा परिणाम असा झाला की, वर्गात दंगामस्ती करूनही मी तीन विषयांत नापास होऊनही आईच्या सल्ल्याने शेवटच्या क्षणी खूप अभ्यास करून ७४% मार्क मिळविले व चांगल्या प्रकारे पास झालो.

आज मी चांगल्या प्रकारे जगात वावरत आहे. शिक्षणाच्या पायऱ्या चढत चढत मी आता 'एम. ए.'पर्यंत पोहोचलो आहे. या सगळ्याचे श्रेय मी माझ्या आईला देतो.

भावी आयुष्यात नोकरी करून आई-वडलांना सुखात ठेवण्याची माझी इच्छा आहे, देव ती पुरी करो.

❖



## माझी धैर्यवान आई

सुनीता कांबळे
एम.ए.

आई म्हटली की, डोळ्यांसमोर येते ती सतत कामात गुंग असणारी, मुलांना काहीही अडचणी आल्या तर न डगमगता कितीही त्रास झाला तरी त्या दूर करणारी, प्रेमळ आई डोळ्यांसमोर येते. आज मी माझ्या आईबद्दल सांगणार आहे. माझी आई 'ममता', ही लहान असताना तिचे आई-वडील देवाघरी गेले. तिचा सांभाळ एका आठ वर्षांच्या सावत्र भावाने केला. हे नावही त्यानेच तिला दिले. तिला लहानपणापासूनच आईवडलांचे प्रेम मिळाले नाही; पण ती नावाप्रमाणेच प्रेमळ, दुसऱ्यांच्या दुःखामध्ये सहभागी होणारी, कोणाच्याही अडचणीला मदत करणारी आहे.

आईला आईवडील नसल्यामुळे शेजारच्या सरुआजीने शेकोटीला बसले असताना आईचे व बाबांचे लग्न जमवले. आमच्या मामाचा या लग्नाला विरोध होता; पण सरुआजी म्हणाली की दादाची गरिबी बघू नकोस तर त्याची कष्ट करण्याची हिंमत, स्वभाव व निर्व्यसनी ह्याकडे लक्ष द्या. आग्रहाखातर आईचे तेराव्या वर्षी व बाबांचे सोळाव्या वर्षी लग्न झाले.

आई तेराव्या वर्षी घरात आली तेव्हा दोन आत्या, आजी, आजोबा व बाबा एवढे कुटुंब होते. तिला माहेरी सांगणारे, शिकवणारे कोणीही नव्हते; त्यामुळे सुरुवातीला ती ऐकायची नाही; पण जेव्हा तिच्या चौदाव्या वर्षी माझा जन्म झाला तेव्हा तिला प्रेमाचा खरा अर्थ समजला व तिने घरातील सर्वांना प्रेम दिले. तिने अगदी काटकसरीने संसार केला. सर्वांना आपलंसं केले.

मी जेव्हा सातवीला होते तेव्हाच वडलांनी माझे लग्न लावून दिले. पण त्या मुलाला मोठी मुलगी हवी होती व मला काहीही समजत नव्हते म्हणून त्या माणसांनी चौदाव्या दिवशी मला माहेरी आणून सोडले व आईला सांगितले की, ही अठरा वर्षांची झाल्यावर आम्ही हिला घेऊन जाऊ. माझे लग्न २८ मे १९८२ला झाले व नंतर २१ मे १९८३ साली समजले की, तो रवींद्र नाईक नावाचा मुलगा वडारवाडीमधील सुनीता नावाच्या मुलीशी २१ मे १९८३ साली

लग्न करणार आहे. तेव्हा आई कोर्टाची पायरी चढली. स्टे ऑर्डर आणली. तरीही दुसऱ्या ठिकाणी जाऊन त्यांनी लग्न लावले.

तेव्हा आईने मला परत शाळेत घालण्याचा निर्णय घेतला व तिने मला परत शाळेत घातले. मी परत सातवीला बसले कारण लग्नामुळे मला सातवीची परीक्षा देता आली नव्हती. जेव्हा मला शाळेत घातले तेव्हा आई मला म्हणाली की, आता बाकीचे विचार बाजूला ठेवून फक्त अभ्यासाविषयी विचार करायचा. नंतर प्रत्येक वर्षी मी पास होत गेले. वय लहान असल्यामुळे कोर्टात सारख्या तारखा पडत होत्या. मी कोर्टात तारखेला फ्रॉक, नंतर स्कर्टटॉप, नंतर पंजाबी ड्रेस व नंतर साडीमध्ये जात असे. एकदा तर तेथील जोगळेकर वकील म्हणाले की ह्या मुलीला दहा वर्षे झाली मोठी होत असताना मी पाहिले आहे. आमची केस अलका टॉकीज येथील फॅमिली कोर्टात गेली. त्यांनी त्या मुलाला एक वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. जेल चालू असताना, एकदा त्याला तारखेला आणले असताना तो मला भेटला व खूप रडला व मला म्हणाला की, "मला खूप चांगली मुलगी मिळाली होती; पण मी तिला ओळखू शकलो नाही. मला माफ कर." ते ऐकून मी जेव्हा केस कोर्टावर होती, तेव्हा म्हणाले की, "जज्साहेब, या मुलाला जी शिक्षा झाली, आता ती पुरे. त्याने मला सोडचिठ्ठी द्यावी व त्याने दुसरी बायको व मुलाला सांभाळावे ही माझी इच्छा आहे." १९९२ साली सोडचिठ्ठी मिळाली. तेव्हा आई परत माझ्या पाठीशी उभी राहिली व तिने माझ्या शिक्षणाकडे सतत लक्ष दिले. मला काहीही कमी पडू नये ह्यासाठी ती धडपडत असे.

माझ्या घरी तेव्हा परिस्थिती जरा नाजूक होती. कारण वडील एकटे कमवणारे व आम्ही सहा भावंडे, आईवडील, दोन आत्या, आजी एवढा परिवार त्यांच्यावर अवलंबून होता. तेव्हा आई म्हणाली की, "सुनीता, तुला जर समाजात राहायचे असेल तर तुझ्या शिक्षणासाठी शिकत असतानाच तुला छोटी मोठी नोकरी करावी लागेल. कारण पैशांविना तुझ्या शिक्षणात काही अडचणी येऊ नयेत." मी एफ. वाय. ला असतानाच हेमराज कटारिया या गृहस्थांकडे मराठी जमाखर्च लिहिण्याचे काम सुरू केले. तसे घरी मुलांचे क्लास घ्यायला सुरुवात केली. नोकरीमुळे माझ्या भावंडांच्या शिक्षणासाठी माझी मदत होऊ लागली.

मी जेव्हा एस. वाय. बी. कॉम. ला होते तेव्हा अनिल कांबळे नावाच्या मुलाने मला लग्नाविषयी विचारले. तेव्हा मी प्रथम आईला व आत्याला सांगितले. आई म्हणाली की, प्रथम त्याच्या आईला भेटणार व नंतर निर्णय



सांगेन. आई आमच्या सासुबाईंना भेटली व माझ्या जीवनात ज्या घडामोडी झाल्या त्या प्रथम सांगितल्या. त्यांनी जास्त वेळ न घालवता म्हणाल्या की, माझ्या मुलाला पसंत आहे तर आमची काहीही हरकत नाही. तेव्हा आईने वडलांना विश्वासात घेऊन माझ्या लग्नाचा विषय काढला. २२ मे १९९४ ला अनिल पिराजी कांबळे ह्या नावाच्या मुलाबरोबर लग्न झाले. सुरुवातीला संसार खूप चांगला चालला होता; पण जेव्हा दोन मुले झाली तेव्हा मात्र अडचणी येऊ लागल्या. दोघेही कंपनीत कामाला होतो. पैसा कमी पडत असल्यामुळे थोडा तणाव निर्माण झाला तेव्हा आई म्हणाली की, असेल त्या परिस्थितीतून मोठ्या धैर्याने तोंड द्यायचे. म्हणजे अडचणी आपोआप दूर होतात.

मी व अनिल दोघेही मुलांना सांभाळण्याचा प्रयत्न करीत असू; पण अनिलची नोकरी गेली; त्यामुळे त्याला खूप टेन्शन यायचे व त्या टेन्शनमध्ये ७ सप्टेंबर २००७ मध्ये तो देवाघरी गेला. मला काहीही समजत नव्हते. दोन मुलांना घेऊन जीवन कसे काढायचे व मी अनिलला विसरू शकेल का? ह्या विचाराने मी अगदी तुटून गेले. माझ्या स्मरणशक्तीवर भुरळ पडण्याची वेळ आली होती. तेव्हाही आईने पुन्हा मला आधार दिला व म्हणाली की तू जर अशी तुटून गेली तर ह्या दोन मुलांना कोण सांभाळणार? तेव्हा मृणाल सहावी व कौस्तुभ तिसरीला होता. तिने अनिल गेल्यानंतर पंधराव्या दिवशी मला कामाला पाठवले.

अनिलच्या नातेवाइकांना मुलांच्या शिक्षणाविषयी विचारले तर त्यांनी मुलांना त्या चांगल्या शाळेतून काढून कॉर्पोरेशनच्या शाळेत घालण्याचा सल्ला दिला कारण तेथे फी चा प्रश्न येत नाही. तेव्हा २५०० रुपये मला पगार होता. तेव्हा आई परत माझ्यापाठीशी उभी राहिली व तिने सांगितले की, मुलांची शाळा चालू राहू दे. मी मदत करेन. काहीही झाले तरी शिक्षण बंद होता कामा नये व तिने सर्व भावंडांना जमेल तशी मदत मला करा असे सांगितले. त्यांनीही मदत केली.

आज माझी मृणाल मेकॅनिकल डिप्लोमाला व मुलगा कौस्तुभ आठवीला आहे. मीही एम.ए. ला प्रवेश घेतला आहे. आज मला कामामध्ये थोडा बरा पगार मिळतो. मी मुलांना व्यवस्थित सांभाळू शकते. माझ्या सर्व प्रगतीचे श्रेय मी माझ्या आईला देते.

अशी माझी आई. सतत माझ्या पाठीशी उभी राहणारी व आलेल्या अडचणींना धैर्याने तोंड द्यायला शिकवणारी माझी आई.

❖

## माझी शांत आई

शांताराम पोखरकर
एम.ए.

'आई' हा शब्द मनात येताच कल्लोळ होतो भावनांचा, अश्रूंचा, मायेचा आणि ममतेचा. आत्मा हा ईश्वराचा अंश आहे. त्यातलीच माझी आई माझ्यासाठी. ज्या कुशीत वाढलो, बागडलो, हसलो, खेळलो त्या मायेच्या छायेखाली खरंच मी कसा घडलो आजही माझे मलाच कळत नाही. परंतु ज्या वृक्षाच्या सावलीला मी बसलो, तो अथांग मातृत्वाचा वृक्ष म्हणजे माझी आई.

कुणाच्या वंशासाठी जन्मलो खरा; पण आईच्या अश्रूंसाठी जन्मलो नाही हेच खरे. आईच माझ्यासाठी अश्रू ढाळते. स्वत: उपाशी राहून ताटातला घास तिने मला दिला. ओल्याशी झोपून तिने मला कोरड्यावर झोपवले. संकटाचा सामना करताना धीर दिला. रस्त्यावर चालताना आधार दिला. समाजात वावरताना मान आणि सन्मान शिकवला. नाही सांगितल्या थोरांच्या गोष्टी. नाही गिरवले थोरांचे कित्ते. पण जिद्दीने आणि ताठ मानेने समाजात जगण्यास मार्गदर्शन दिले.

आई कधी माझ्यापेक्षा मोठी झालीच नाही; ती नेहमी माझ्यासाठी लहान झाली. माझा भाऊच मोठा. तोच गुणी. त्याच्यासारखा मला तरी दुसरा कोणीही असे म्हणून स्वत: लहान होऊन मला जिने मोठं केलं ती माझी आई

जात्यावर दळण दळताना ती मला मांडीवर घेत असे. मी झोपताच तिच्या त्या जात्यावरच्या ओव्या ऐकत असे....

**''माझा ग भ्रतार**
**मला मुलखाचा आधार**
**बाळ शांताराम, हाच माझा राम**
**बंधु माझा यशवंत**
**करी शांतारामा ग कीर्तिवंत**



**गाय गोठयातली पुतळी**
**शांतारामाला नेते रावळी....''**

असे गाणं म्हणताना मी केव्हाच झोपून जात असे. त्या गुलाबी पहाटे शांत झोप लागत असे. मग थोड्या वेळाने हळूच जागा झालो की, आई पुन्हा गुणगुणे....

**''भानु आला वर वर**
**कासरे लावले ग गोठ्यात**
**वासरे ग पितात गाईला**
**बाळ माझा ग सुकला त्याला**
**दुधाचा ग पेला.......''**

हळूच बाप दुधाचा अर्धा ग्लास मला देत असे..... तोच, आई जोरात ओरडत असे. भरून घ्या पेला.... अहो, ज्या आईने बापाकडे कधी पै मागीतली नाही, चिंध्या, लुगड्यावर कधी कोरं कापड नाही मागितलं. उपाशी असताना कधी पोटभर अन्न नाही मागितलं. त्याच आईने माझ्या शांतारामाचा दुधाचा ग्लास रिता राहिला म्हणून माझ्याच बापाचा मार खाल्ला; पण पेला भरून घेतला.

शेताच्या बांधावर झाडाला झोळी करून, वावरात काम करताना निम्मं लक्ष तिचं माझ्या झोळीकडे आणि निम्मं लक्ष कामाकडे. पण स्वत:कडे कधी तिने लक्ष दिलं नाही.

आज माझी आई माझ्यासाठी सर्व काही असली तरी मी माझ्या आईकडे खरंच लक्ष देतो का? ज्या हातांनी तिनं मला धुतलं, पुसलं आणि सावरलं, त्या आईकडे मी खरंच त्याच मायेने पाहतो का? अरे, हे आयुष्य कशासाठी आहे रे देवा तेच कळत नाही. आज जिच्या केवळ शब्दावर मी उभा आहे, त्याच आईच्या थकलेल्या जीवनावर आज मी काय म्हणून तिला काय करू शकतो.

आज माझी आई खरंच माझ्यासाठी उपेक्षित आहे का? लहान असताना माझ्यासाठी जिने बापाचा मार खाल्ला, समाजाच्या अहवेलना झेलल्या, नातेसंबंधांचे बोल घेतले. मैत्रिणीची चेष्टा सहन केली. आज तीच माझी माउली खरंच सावलीत आहे का? जिने आयुष्याच्या प्रत्येक वळणावर सावली दिली, तिलाच आज उन्हात कण्हत उभी राहण्याची वेळ आली असेल तर माझ्यासारख्या पातक भ्रमीत माणसाला स्वर्गच काय पण नरक यातनाही कमी आहेत.

जिच्या जिभेवर माझ्यासाठी अपशब्द आला नाही, तिच्यासाठी माझ्याकडे कोणतेच मापदंड नाहीत. उपकार फेडण्यासाठी... आज मी जगात वावरलो, सावरलो, सुखावलो. त्या माउलीकरता श्वासापेक्षा जास्त जवळीक न ठेवता मी स्वार्थी, अप्पलपोट्या, लबाड आणि कावेबाज का झालो? देहभान विसरून, उन्हातान्हाची तमा न बाळगता देवापेक्षाही जास्त माझा ध्यास घेणारी माझी आई आज माझ्यापासून दूर असताना कोणत्या यातना सहन करत असेल, परमेश्वरा!

घराच्या भिंतीपलीकडे नव्हे आई तू आज मला तर जगापलीकडे आहे असे भास, आभास होतात. केवळ कुणामुळे हे परमेश्वरा तुलाच ठाऊक; पण देवा माझ्या आईच्या प्रत्येक श्वासातला प्राणवायू आज मला दरवळून आणतो, जागा करतोय, स्वार्थी होऊ देऊ नकोस, मन हेलावून टाकणारे क्षण आजही मी झेलू शकलो नाही. त्याचे दुःख मी आज आठवून उन्हाळ्यात थंड पाणी घोटाघोटांनी प्यावं तसं आई तुझं दिलेलं प्रत्येक आभूषण जीवनातील दुष्काळात मी पीत आहे. त्यातून जे धैर्य मला प्राप्त झाले आणि होत आहे.

सांग आई, काय केलं म्हणजे मी तुझ्या या परम उपकारातून मुक्त होऊ शकतो, असा कोणताच मार्ग, प्रत्यक्ष परमेश्वराने अजून तरी क्रमियेला नाही. मी तर एक पामर आहे. देव निर्जीव असेल; पण आत्मा सजीव आहे. पण आई तू तर चल आहे. तुझ्याच आठवणीने मी धीरोदात्याचा मार्ग क्रमित आहे. तो चांगला क्षण देवा, तुला हात जोडून प्रार्थना करतो, माझ्याकडून हिरावून घेऊ नको. नाहीतर मी पोरका झालो ना, तर जो आक्रोश करेल त्यासाठी या विश्वात अजून काहीच तुला देण्याकरिता नसेल.

म्हणूनच तर तिच्याविना आपण सर्व भिकारी आहोत आणि भिकाऱ्याला उपाशी ठेवण्याचे पाप देवा, तू तरी करणार नाही असे मला वाटते.

❖



## स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी

**राहुल हांडे**
**एम.ए.**

माझी आई चौथीपर्यंतच शिकलेली होती. तरीही शिक्षणाचे महत्त्व तिने ओळखले होते. म्हणूनच स्वतःच्या जीवनात अपार कष्ट सोसून तिने स्वतःच्या तीन मुली व दोन मुलांना पदवीपर्यंतचे शिक्षण दिले. शिक्षण हाच 'विकासाचा' मूलमंत्र आहे हे तिनेच मला शिकविले.

माझ्या आईला शिक्षणाची अतिशय आवड होती; त्यामुळेच मला व माझ्या भावाला शाळेत सोडणे व शाळेतून घरी घेऊन येण्याचे काम सतत सात वर्षे नियमाने व न कंटाळता आवडीने केले. सहावीनंतर मी शाळेत एकटा जायला लागलो; परंतु शाळा सुटल्यानंतर घरी परतण्याची मला फार ओढ लागायची व कधी एकदा आईला भेटेल असे व्हायचे.

माझी आई अल्पशिक्षित होती; परंतु माझ्या शिक्षणाबाबत ती अतिशय जागृत होती. परीक्षा आल्या की, मी काय अभ्यास करतोय यावर तिचे लक्ष असे व पेपरला जाताना म्हणायची, "हाच्चा द्यायला विसरू नकोस." आजही परीक्षेला जाताना, मला तिच्या ह्या सल्ल्याची आठवण होते.

माझ्या आईला शिकण्याची फार आवड होती. आमच्या घराजवळच्या अंबामाता मंदिरात रोज गीतापाठ चालत असे. घरातील सर्व कामे आटोपल्यानंतर, दुपारी दोन ते चार ह्या वेळात 'भगवत्‌गीता' शिकण्यासाठी ती मंदिरात जात असे. भगवत्‌गीता संस्कृत भाषेत असल्यामुळे तिचे वाचन करणे आईला अतिशय कठीण जायचे; परंतु रोजच्या सरावाने व चिकाटीने ती गीता वाचायला शिकली व पुढच्या दोन वर्षांतच आईने गीतेची प्रार्थना, नववा, बारावा व पंधरावा अध्याय त्याचप्रमाणे 'विष्णुसहस्रनाम' व 'हरिपाठ' मुखोद्‌गत केले. आज तिच्याच प्रेरणेने मीसुद्धा रोज ह्या 'गीता माउली'चे पठण करतो.

माझ्या आईचे राहणीमान अतिशय साधे होते. नऊवारी साडी,

डोक्यावर पदर व कपाळाला मोठा कुंकवाचा टिळा अशी तिची वेशभूषा होती. आयुष्यातील तीस वर्षे ती पुण्यात राहिली; परंतु शहरी संस्कृतीचा प्रभाव कधीही तिच्यावर पडला नाही. तिने कधीही चित्रपटगृहात जाऊन सिनेमा पाहिला नाही, की नव्या साड्या किंवा दागिन्यांसाठी नवऱ्याकडे हट्ट धरला नाही. 'माझी मुले' हीच माझी धनसंपदा असे ती नेहमी म्हणे. जात्यावर म्हणायची अनेक गाणी तिला तोंडपाठ होती. देवाची भजने म्हणण्याचा तिला छंद होता व देवाचेच चिंतन करण्याची तिला आवड होती. ती नेहमी म्हणायची -

**''जावू देवाच्या गावा!**
**देव देईल विसावा!!**
**देवा सांगू सुख दुःख!**
**देव निवारिल भूक!! ''**

माझ्या आईला आई-वडील, पाच भाऊ, एक बहीण असा माहेरचा मोठा गोतावळा होता; परंतु स्वतःच्या संसाराचे रडगाणे तिने कधीही आपल्या नातेवाइकांना सांगितले नाही. पतीच्या तुटपुंज्या पगारात, मोठ्या कौशल्याने पाच मुलांचा संसार केला. मुलांना कोणत्याही गोष्टींची कमतरता पडू दिली नाही. संस्कार व शिक्षण देऊन, मुलांना समाजात ताठ मानेने चालायला शिकवले. स्वत:साठी न जगता, दुसऱ्यांसाठी जगा अशी शिकवण दिली.

''जीवनात कधीही निराश होऊ नकोस व येईल तो दिवस आनंदात घालविण्याचा प्रयत्न कर.'' असा पाठ तिने मला दिला. आईसह माझे जीवन अतिशय सुंदर होते; परंतु माझ्या भाग्याला कोणाची दृष्ट लागली कोण जाणे, तिला देवाने बोलाविले.

अल्पशः आजाराने व मधुमेहाने तिचा घात केला. वीस दिवसांच्या आजारात ती देवाघरी निघून गेली. मी खऱ्या अर्थाने पोरका झालो. जीवन निरस झाले. 'आईविना भिकारी' असे कवी का म्हणतो याचा अनुभव मी घेत आहे. आईची आठवण आली नाही असा एकही दिवस जात नाही.

❖



# मातृत्वाचा सुगंध

**नयना पाचारणे**
**एम.ए.**

परमेश्वराने सृष्टी निर्माण केली म्हणून आपण त्याला परमेश्वर म्हणतो. मग माझ्या आईने मला जन्माला घातलं तर ती माझी परमेश्वरच नाही का? माझी आई माझ्यासाठी काय करत नाही? माझ्यासाठी काय नाही केलं तिने? बालपणीच्या अंगणात खेळवताना माझ्या हाताचं बोट धरून या दुनियेत ठामपणे पाऊल कसं टाकावं हे शिकवले तिने..... रस्ते सरळच असतात, आपली पावलं वाकडी पडतात. म्हणून वाकड्या रस्त्यावरही सरळ पाऊल कसं टाकावं हे तिने शिकवलं मला. ओघळणारे अश्रू पाहिलेत मी. आणि त्या अश्रूमागं दडलेलं दुःखही पाहिलंय मी.... भान विसरून माझं कौतुक करताना पाहिलंय मी. क्षणभर विसरताना तिला पाहिलंय मी आणि मध्येच भानावर येतानाही पाहिलंय मी.

आज मीही आई आहे. आई म्हणून जगताना, मुलांवर संस्कार करताना आईने माझ्यावर केलेले संस्कार मला आठवतात. आपल्या मुलांवर संस्कार करताना आपण कुठे कमी पडत नाही ना ही कमीपणाची भावना मनात सारखी डोकावत असे.

शेवटी आई ती आईच असते. ती तुझी किंवा माझी नसते... आई असते एका फुलाची कळी. सतत उमलत राहून सुगंध दरवळत ठेवणारी. आई असते क्षमेची मूर्ती, आपल्या मुलांचे अनेक अपराध पोटात घालणारी. आई असते एक सावली, सतत सोबत राहून मार्ग दाखवणारी. आई असते एखाद्या मोठ्या गोष्टीसाठी एखादी लहानशी गोष्टही किती महत्त्वाची असते ते पटवून दिलंय मला. तसेच माझे निर्णय माझे मीच घ्यावेत याबद्दल ती आग्रही असे. 'आई' या शब्दाचा अर्थ तिच्या प्रत्येक कृतीतून तिने मला समजावून सांगितला.

हाताचे बोट पकडून तिने मला चालायला शिकवले. चालता चालता कधी पडलेच तर जगताना अशीही संकटे येतात असं म्हणत पुन्हा उभं

करून त्यावर मातही करता येते हे शिकवले. हातामध्ये दूध-भात घेऊन अंगणामध्ये माझ्या मागे पळताना चिऊ काऊच्या गोष्टी सांगत माझ्यासाठी अंगाई गीत म्हणून जगातल्या पहिल्या साहित्याची ओळख करून देत. त्या मागचा अर्थही समजावून सांगितलाय तिने मला. जगातील पहिली कविता अंगाईच्या रूपाने आईच्या तोंडी जन्माला आली म्हणून आजही आई इतकंच अंगाईशी नातं जवळचं वाटतं.

आईचे बोट सोडून जगात वावरायला लागले तरी घारीसारखी आईची नजर माझ्याकडेच असते. कोणत्याही अपयशाने खचून न जाता अपयशावर मात कशी करावी हे आईनेच शिकवलंय मला; त्यामुळे आजचे माझे यश पूर्णपणे माझ्या आईमुळेच मला मिळाले.

आईची वेगवेगळी रूपे मी माझ्या डोळ्यांत साठवून ठेवलेली आहेत. सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावर परोपकार, स्वत:साठी न जगता इतरांसाठी जगणारी.

मग माझी आई ती यापेक्षा वेगळी काय असणार. आईनं दिलेला हा अनमोल मूल्यांचा वारसा आई म्हणून पुढं नेताना मला अभिमान वाटतो. आईच्या ओंजळीतून मिळालेली ही संस्कृती आईची ओंजळ म्हणून जपताना माझ्या आईपणाच्या मातृत्वाला एक वेगळाच सुगंध दरवळला आहे.

❖



## आईची शिकवण

प्रतिभा तोरे
एम.ए.

बेताची उंची, गोरीपान, सुदृढ बांधा, हसतमुख चेहरा, ठसठशीत कुंकू. स्वच्छ, नीटनेटकी राहणी हे वर्णन हुबेहूब माझ्या आईचं. शांत चेहरा, सात्त्विक वृत्ती, प्रेमळ, अगत्यशील स्वभाव त्यामुळे फक्त घरादारालाच नव्हे तर नातलगांत शेजारीपाजारी सगळ्यांना अतिशय प्रिय. तिला कधीही थकलेलं, आळसावलेलं पाहिल्याचे स्मरत नाही.

वयाच्या सतराव्या वर्षी लग्न होऊन ती सासरी आली. माझे वडील सरकारी नोकरीत पुण्याला असल्याने थोड्याच दिवसांत ती बेळगाववरून पुण्याला आली; त्यावेळी घरात तिच्याच वयाचे दीर, पुतणे शिक्षणासाठी वडलांकडे राहिले होते. पण तिने ही जबाबदारी सहज पेलली. आम्ही चार भावंडं, शिक्षणासाठी, नोकरीच्या निमित्ताने असणारे अनेक नातेवाईक या सर्वांचे तिने हसतमुखाने केले. कधीही चिडलेले, वैतागलेले आम्ही पाहिले नाही.

आईचे वडील लहानपणीच गेल्याने ती आपोआपच समजूतदार झाली होती. घरात ती मोठी, धाकटी दोन भावंडे; पण लग्नानंतर तिने तीही जबाबदारी घेतली. एका भावाला नोकरीच्या निमित्ताने व लहान भावाला शिक्षणासाठी तिने मदत केली. आज आमच्या घरातील जी आताची पिढी तयार झाली आहे तिच्यामागे कोठे ना कोठे तिचा हात आहे.

आजकालच्या आधुनिक म्हणून घेणाऱ्या जगात स्वत:चे आईवडीलही जिथे जड वाटतात, तिथे मी माझ्या आईवडलांना नात्यागोत्यातलेच नाही तर परक्या लोकांनाही आपले म्हणून मदत करताना अनुभवले आहे. आणि हे करताना तिने कधी राग, तिटकारा दाखवलेले आठवत नाही.

वडील पोलिस-ऑफिसर असल्याने त्यांची बदलीची नोकरी अशा वेळी आमच्या सर्वांच्या शिक्षणासाठी तिने पुण्यात राहण्यालाच प्राधान्य

दिले. आई आणि बाबा अशा दोन्ही भूमिका तिने उत्तमरितीने पार पाडल्या. आमच्या सर्वांच्या प्रगतीवर तिचे बारीक लक्ष असायचं. अभ्यासाबरोबरच आमच्याकडून तिने सर्वांगीण विकासाची अपेक्षा धरली. आम्ही तिघी बहिणी वेगवेगळ्या खेळांत शाळा व कॉलेजमध्ये भाग घेत असू. अशा वेळी खंबीरपणे पाठिंबा देऊन तिने आम्हाला प्रोत्साहन दिले; त्यामुळे आम्ही काही काळ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करू शकलो.

माझ्या भावाला पायलट होण्याचा लहानपणापासून ध्यास होता. बारावीनंतर कोर्ससाठी तिनेच त्याला पाठविले व धीर दिला. आज आम्ही आपआपल्या जीवनात यशस्वीपणे उभे आहोत. त्याचे सर्व श्रेय तिलाच जाते. जीवनात पैसा हा महत्त्वाचा; मात्र माणुसकी जीवापलीकडची, हेच तिचे म्हणणे. दूरदृष्टीने तिने लहान गुंतवणुकीवर भर दिला आणि बचत आमच्या अंगीही बाणवली.

ममता आणि दयेने तिने खूप जणांशी जन्मभरासाठी नाती जोडली. शेजारच्या देशमुख आजी पडल्या. घरात वाद असल्यामुळे त्यांच्याकडे कोणी बघत नसे. अशा वेळी आईने त्यांच्या मुलांना खडेबोल सुनावलेच; पण त्या पूर्णपणे उभ्या राहीपर्यंत जेवणा-खाण्यापासून सर्व परीने मदत केली. घरात सर्व स्वच्छता आईच करायची; पण म्हाताऱ्या सखुबाईला मदत म्हणून तिने कामाला ठेवले. ती येण्याअगोदरच तिचे सर्व आवरलेले असायचे; पण फुकटचे पैसे दिले तर त्याला मोल राहत नाही हे जाणून ती त्यांना काम द्यायची. दररोज चहा-नाश्ता तर ठरलेलाच. गावातली लक्ष्मीबाई जिचे लहान लॉन्ड्रीचे दुकान होते. मात्र नवरा मुले काहीही कमवत नसत. तिलाही दररोज काहीना काही देत असे. संसारासाठी कष्ट करायला अंगात बळ हवं म्हणून या सर्वांना पोटभर जेवण द्यायची.

आई खरंच अन्नपूर्णा होती. घरी आलेला प्रत्येकजण खाल्ल्यापिल्ल्याशिवाय गेलाय हे कधी आम्ही पाहिलं नाही. वेगवेगळे प्रकार करण्याची, सर्वांची आवड लक्षात ठेवून ते त्यांना पोटभर खायला घालायची खूप हौस. सगळ्यांचे वाढदिवस लक्षात ठेवून ती काही तरी भेट नक्की द्यायची.

आपण आपलं मन शुद्ध ठेवावं. मनाचा हेतू चांगला ठेवावा. मग आपल्याला शेवटी चांगलेच फळ मिळते. हा तिचा स्वभाव. माझी आई जाऊन आता दोन वर्षं होतील.



आज माझी आई आमच्यात नाही; पण तिची शिकवण व आठवण या रूपात ती नेहमीच बरोबर असल्याचे जाणवते. तिच्या आजारपणातही तिने शेवटपर्यंत हसतमुखाने संघर्ष केला. ब्रेन ट्यूमरसारख्या आजारालाही आश्चर्य वाटावे इतक्या धैर्याने ती सामोरी गेली. शेवटपर्यंत हसतमुख राहिली. तिचा हात शेवटपर्यंत देण्यासाठीच उचलला गेला. जर पुनर्जन्म असेल तर मी देवाजवळ हेच मागणं मागेन की, जन्मोजन्मी हीच आई मला मिळो.

❖

## आई म्हणजे ईश्वर

संगीता जाधव
एम.ए.

"आई ग."
"बोल."
शांतता.....
"आई ग."
"बोला..."
परत शांतता.

हे असं माझं दिवसभर चालू असतं. नुसतं 'आई' या बोलण्यामध्येपण जे सुख आहेना त्याबद्दल काय लिहिणार आणि सांगणार. तर असं मी माझ्या आईला पीडते, त्रास देते आणि तिच्या मते जर तिला मी असा त्रास दिला नाही तर दिवस संपूर्ण होत नाही. माझा दिवस सफळ संपूर्ण करण्यासाठी मात्र मला तिचा फटका मिळत असतो.

हरतालिकेचं व्रत केल्यावर शंकरासारखा रौद्रावतारी नवरा मिळतो, असे माझी आई मानते. तो तिचा स्वानुभव आहे. मात्र नक्की कुठलं व्रत केल्यावर रागीट नवरा आणि त्याच्या दुप्पट संतापाची मुलगी मिळते हे तिला अजून समजलेले नाही. माझे वडील जितके भडकतात, तितकीच किंवा त्याहून जास्त मी चिडते आणि आमच्या दोघांच्या संतापात सॅण्डविच मात्र आईचं होतं.

पण मला माझ्या आईला भडकावायला जाम आवडतं. अशा वेळेला ती एखादा फटका देते, मी घरभर पळत असते. आणि मी दमल्यावर मग आई मला मारते. खरंतर मला लागत वगैरे काही नाही; पण उगाच "माझी आई मला खूप मारते. ती दुष्ट आहे!" वगैरे म्हणून भोकाड पसरलं की ती मला अजूनही लगेच सॉरी म्हणते अर्थात प्रत्येक सॉरीची किंमत ठरलेली असते.

आईला स्वयंपाकाचा अजिबात कंटाळा येत नाही. पहाटे पाच वाजता



उठून ती कामाला लागली तरी सात वाजता सर्व काम संपवून मोकळी होते. मग दिवसभर तिचे नाना उद्योग चालू असतात. आम्ही कोणीच त्यानंतर घरी नसल्यामुळे तिचा दिवस नक्की कसा जातो याची कल्पना नाही. पण ती टी. व्ही. बघणे हे एक काम सोडून दुसरे काहीतरी शिवणं, टिपणं वगैरे करत असते. नाही तर फोनवरून सर्व नातेवाइकांची खबर घेतेच घेते. गोव्याला सासुबाईंकडे आज घेवड्याची भाजी होती. इथपासून ते ऑस्ट्रेलियाची भाचेसून घरात घसरून कशी पडली इथपर्यंत सर्व माहिती तिच्याकडे रेडी असते. माझ्यापेक्षा जास्त चांगली पत्रकार ती बनली असती...

स्वत:चे अपूर्ण राहिलेलं शिक्षण हे तिचं सगळ्यात मोठं स्वप्न. ते तिने माझ्याकडून पूर्ण करवून घेतलं. लहानपणापासून आतापर्यंत कधीही "हे काम तू कर" असं कधीच सांगितलं नाही. "आधी अभ्यास कर. घर चालवायला काय अक्कल लागत नाही" हे ती मला अजूनही म्हणतेच. आजही चहाचा कप माझ्या हातात येतो. भले, मी नेटवर गप्पा मारत असू देत किंवा कादंबरी वाचत असू दे. मी तर कायम म्हणते. "मी आळशी आहे याला कारण माझी आई."

माझ्या आईने माझ्यासाठी फार वाईट दिवस पाहिले. एक काळ असा होता की, चाळीस पैशांचा ब्रेड मला देणं तिला जमत नव्हतं. माझे लहानपण खडतर गेलं म्हणून आज मी काही पैसे उधळले तरी तिची ना नसते. आईला मी पाच वर्षांची असताना मला एक निळा फ्रॉक घ्यायचा होता; पण किंमत तिच्या बजेटबाहेर जात होती. त्या दिवाळीला मला नवीन कपडे घेतले नाहीत म्हणून आई दर दिवाळीला मला पाच ते सहा ड्रेस घेते. स्वत:ला साडी मात्र घेत नाही. पप्पा मात्र पाडव्याच्या दिवशी तिला साडी गिफ्ट देतात. आईचा मॅचिंग ब्लाउज, परकर तयार असतो. असा हा अजब वेंधळेपणाचा सोहळा आमच्याकडे दरवर्षी असतो.

बहुतेक आया मुलींनी कसे कपडे घालावेत यावर तावातावाने बोलत असतात. माझी आई सरळ सांगते, तुला जे आवडतं ते तू घाल. गंमत म्हणजे माझे टॉप बघून ती कायम म्हणते. "पोरी, तुला लहानपणीपण याच्यापेक्षा मोठी झबली घातली आहेत मी."

माझ्या भावाच्या मुंजीच्या वेळेला मी मस्त स्लीव्हलेस ब्लाऊज घातला होता. माझी मामी म्हणाली, "असे कपडे शोभत नाहीत तिला.... लग्नाची झालीये आता..."

आईबाई लगेच, ''अहो, छान दिसतो तिला म्हणूनच शिवून घेतलाय मी. तिला तर माहीतपण नव्हतं. हल्ली अशीच फॅशन आहे म्हणे.'' बिचारी मामी!!

माझी आई एक गृहिणी आहे. तिच्या लक्षात आलं की, आयुष्यात सफलता मिळवणारे लोक टी. व्ही. बघण्यात वेळ घालवण्याऐवजी वाचन करण्यात वेळ घालवतात. तिने आम्हाला सांगितलं की, एक दोन पुस्तकं आणून वाचायची आणि काय वाचलं संक्षेपाने लिहून तिला दाखवायचं. ते ती वाचायची आणि तिचे शेरे द्यायची. काही वर्षांत आमच्या लक्षात आलं, तिची तीही एक चाल होती. आमची आई जेमतेम तीन ग्रेड्स् शिकलेली होती.

मी हायस्कूलमध्ये असताना वरचा नंबर घ्यायचे; पण हे जास्त वेळ टिकलं नाही. माझा वर्गातला नंबर घसरत खाली गेला.

माझ्या कुठल्याही कार्यक्रमामध्ये ती हिरिरीने सहभागी होते. भले मग तो डान्स असो; नाटक असो किंवा अजून काही. लोकांना खायला घालण्याचा तिला जबरदस्त नाद आहे. काही झालं की, ''तुला भूक लागलीये का?'' हा तिचा पहिला प्रश्न असतो. तिच्यामते मला भूक लागलेली समजत नाही. त्यामुळे मी तणतणायला लागले की माझ्या पुढ्यात काहीतरी खायला आणून ठेवते. भावाच्याबाबतीतपण हे असंच बरं का.

माझ्या आईचा मला अभिमान आहे. मला कोणी काही बोललेलं तिला अजिबात सहन होत नाही. स्वत: मात्र माझी रोज पूजा बांधतच असते. ते चालतं. दुसरं कुणी बोललं की मग मात्र लगेच आई चिडते.

माझी आई माझी मैत्रीण आहे. दिवसभरात जे काही घडलं असेल ते मी आईला सांगतेच सांगते. मस्त गोष्ट म्हणजे ती मला कधीच सल्ला देत नाही. कारण तो मला पटणार नाही हे तिला माहीत आहे.

''आई ग... तुझ्यावर एक लेख लिहू का ग?''

''कशाला? लोकांना तुझी आई किती अडाणी आहे हे समजायला?''

आईची खूप आठवण होते आहे. अनेक प्रसंगांत अगदी खरं सांगायचं तर आजारपणात जास्ती.... आईच हवी असते.

एखादी साधी कविता जरी लिहिली तरी आईला आधी वाचून दाखवायची असते.......छोट्या छोट्या प्रसंगांमध्ये आनंद मिळवायला आईनेच शिकवले आहे.



आद्य ईश्वर म्हणजेच आई....

अगदी खरं आहे आपलं म्हणणं. म्हणून मी माझ्या एका कवितेत म्हणते..

**''पाहिले नसेल मी त्या 'देवाला' जरी**
**त्याला पाहण्याची मला**
**असे काय जरुरी?**
**अगे, आई**
**कमलमुखी तू सुंदर असता**
**रूप 'देवाचे' कसे वेगळे?**

**असता जवळी दुनियेतली दौलत जरी**
**तुझ्यापुढे आम्हां त्याची काय जरुरी**
**अगे, आई**
**कमलमुखी तू सुंदर असता**
**रूप 'देवाचे' कसे वेगळे?''**

❖

## आईचा सहवास

**श्रीकांत कुलकर्णी**
**एम.ए.**

प्रत्येक जिवाला आई असतेच; पण माझ्या आईचा प्रवास चौऱ्याण्णव वर्षांचा झाला व या प्रदीर्घ प्रवासात ती 'आई, आजी, पणजी व खापर पणजी' ह्या सर्व नात्यांतून व अनुभवांतून गेली. अशा दीर्घ प्रवासात आपला जोडीदार म्हणजे माझे वडील त्रेचाळीस वर्षांपूर्वीच निधन पावले होते. संसाराची नौका अर्ध्यावरच आली होती, अशा परिस्थितीत ती माउली खंबीरपणे उभी राहिली. अशा या माझ्या आईचा सहवास मला पासष्ट वर्षे लाभला म्हणजे मी किती नशिबवान!

आईची सेवा करायला मिळाली व तिचा प्रदीर्घ असा सहवासही. यक्षाने युधिष्ठाराला विचारलेल्या प्रश्नाने एक क्षणभर मी भांबावून गेलो. प्रश्न असा होता, वृद्धांची सेवा केली असता, माणूस बुद्धिमान होतो. मला माझ्या आईचा सहवास माझ्या आयुष्याच्या सर्वच अवस्थेत लाभला. बालपण ते वृद्धत्व, त्यामुळे वरील प्रश्नांबाबत मी आत्मचिंतन केले, वाचन केले, व त्यातून त्याचा सर्व बोध होत गेला.

बालपणी आई म्हणजे सर्वस्व असते. तिच्या मायेची ऊब बालपणात आपोआपच मिळते. त्याच वेळेस ती आपल्यावर संस्कार करत असते. संस्कार विचारांचा प्रवाह नसून तो थोरा-मोठ्यांच्या अनुकरणातून पोहोचणारा शुद्ध झरा असतो. विवेकात संस्काराचा गर्भ असतो. विचारातून तो वाढत जातो. आणि आचरणातून संस्कार जन्म घेतो. अशा या माझ्या बालपणात मला फार मोठी संस्काराची खाण आईकडून मिळाली. शेवटी संस्कार म्हणजे तरी काय असे विचारले तर ती एक जीवन जगण्याची कला आहे. त्यामध्ये माणुसकी कशी जपायची, सत्त्व गुणांची कशी वाढ करायची हे कळत नकळत शिकवले जाते. बालपणीच जर चांगल्या विचारांची पेरणी झाली तर भविष्यात त्याची चांगली फळे खायला मिळतात. आणि या गोष्टीचा फायदा मला आईकडून झाला. बालपण



म्हणजे तप्त लोखंडच; त्यामुळे संस्कार जीवनानुभूतीतून, आघातातून जीवनाला जसा आकार पाहिजे तसेच चांगले संस्कार माझ्यावर झाले. या संस्काराच्या भक्कम पायावर जीवनाची इमारत उभी राहिली व आयुष्यभर या संस्कारित जीवनाची सवयच झाली.

तारुण्यात प्रवेश केल्यावर आपण आईपासून थोडे लांब राहतो; पण आईची कडक शिस्त व तिची नजर सतत असल्यामुळे आम्हाला चांगल्या संगतीचेच मित्र मिळाले. खाण्यापिण्यावरही लक्ष होते; त्यामुळे सात्त्विक असेच माझ्या आहारात असायचे, पौष्टिक आहार व व्यायामामुळे तारुण्यात आवश्यक असलेली ताकद मी कमवू शकलो. कोणत्याही व्यसनाच्या आहारी गेलो नाही. परिस्थितीने श्रीमंत नसलो तरी गरिबीचे चटके बसू दिले नाहीत. कोणत्याही प्रकारचे लाड केले गेले नाहीत. लवकर उठण्याची सवय व शिस्तबद्ध जीवन जगण्याची ऊर्जा मला आईकडून मिळाली. आम्हा सर्व भावंडांत मी लहान होतो व घरची शेती होती. मला शेतीची आवड होती; त्यामुळे माझ्या हातून काळ्या आईचीही सेवा घडली. पदवीचे शिक्षण घेण्यापेक्षा शेती करावी हा माझा हट्ट मला माझ्या आईवडलांमुळे पूर्ण करता आला नाही; पण माझ्या भविष्याच्या दृष्टीने मला योग्य असा सल्ला व मार्गदर्शन घरात लाभले. मी पदवीनंतर उच्चशिक्षण घेण्याचा मानस व्यक्त केला; पण दुर्दैवाने माझे पितृछत्र हरपले होते. त्यावेळेस आईची मूकसंमती घेऊन चार्टर्ड अकौंटंटसारखा कोर्स पूर्ण केला. माझ्या शैक्षणिक प्रगतीला खतपाणी घालण्याचे काम आईने केले. म्हणून मी एम. कॉम. व एलएल.बी.ही पूर्ण करू शकलो. अर्थात हे सर्व शिक्षण माझ्या लग्नानंतर पूर्ण केले. त्यामुळे मला आईइतकेच कदाचित जास्त सहकार्य व उत्तेजन माझ्या पत्नीकडून मिळाले.

तारुण्यातून मी गृहस्थाश्रमात प्रवेश केला. तेव्हाही माझ्यासोबत आई होती. लग्नानंतर ज्यावेळेस वृद्ध माणूस घरात असते, तेव्हा आपल्या स्वैर वागण्यावर आपोआप बंधने येतात. आईमुळे व तिच्या असण्यामुळे आम्ही बंधनयुक्त असे जीवन जगलो. आई केंद्रस्थानी ठेवूनच मी माझी प्रगती साधली. आईमुळे माझे घर हे मुख्य घर बनले; त्यामुळे आम्ही सर्व नाती जपू शकलो. तसेच येणाऱ्याचे पाहुणचार, अन्नदान तसेच, रूढी परंपरा याची चांगली ओळख झाली व त्याची जपणूक करू शकलो. माझी आई धार्मिक, श्रद्धाळू व सनातनी विचारांची होती. त्याचबरोबर माझ्या वडलांच्या स्वभावामुळे तिला सामाजिक तसेच तळागाळातल्या

लोकांबद्दल जिव्हाळा होता. या सर्व गोष्टींचा माझ्या संसारात खूप उपयोग झाला. माझ्या दोन्हीही मुलांना हक्काची आजी मिळाली. तसेच घरात वृद्ध माणूस असताना त्यांच्याशी कसे वागावे याचेही शिक्षण मिळाले. आमच्या आदबशीर वागण्यामुळे घरात वादविवाद न करणे, मोठ्या आवाजात न बोलणे, संध्याकाळी लवकर घरी येणे, रात्री लवकर झोपणे, सकाळी लवकर उठणे, घरात धार्मिक वातावरण ठेवणे अशा अनेक गोष्टींचे फायदे आम्हाला आईकडून मिळाले.

माझी आई नव्वदीत गेली तेव्हा मी ज्येष्ठ नागरिक झालो होतो. थोडक्यात वृद्धच म्हणाना! अशा वेळसही माझी आई हयात असल्यामुळे मी तरुणच होतो.

माझ्या शैक्षणिक यशामुळे, भौतिक प्रगतीमुळे मी सुस्थितीत होतो. एका वयोवृद्ध मातेचा सांभाळ करताना ती मला लहान मुलगाच म्हणून माझ्याशी वागे, मी जरी उच्च पदावर होतो तरी त्याचा तिला काही फरक नव्हता. माणसातील मीपणा जिरवण्यासाठी, अहंकार नाहीसा होण्यासाठी म्हाताऱ्या माणसांचा कसा फायदा होतो, याचे उत्तम उदाहरण व अनुभव मला मिळाला. वृद्ध माणसाचे अपमानित बोलणे ऐकून घेण्यासाठीची सहनशीलता हा गुण मला प्राप्त करता आला. सर्व गात्रे शिथिल झाल्यावर वृद्धांची काय अवस्था होते. वार्धक्य म्हणजे काय? हे डोळ्यांनी पाहता आले. व अशा या वृद्ध आईची सेवा करत असताना अहंकार गळून पडला. भौतिक सुखे आज लोप पावली. जीवनामध्ये विरक्तीने जागा घेतली. मनातील द्वंद्व गळून गेले. पैशाच्या बँकेपेक्षा माणसांची बँक किती महत्त्वाची याचे महत्त्व कळले. आध्यात्मिक प्रगतीची ओढ लागली. संतांची भाषा कळू लागली. गृहस्थाश्रमातून वानप्रस्थाश्रमात प्रवेश करताना कुठलीच बोचणी लागली नाही. जीवनामध्ये काय महत्त्वाचे याची पारख झाली. सेवावृत्तीची जपणूक करताना व प्रत्यक्षात सेवा करताना मनात कोणतेही द्वंद्व निर्माण होत नाही. आज माझी आई हयात नाही. तिला चौऱ्याण्णव्या वर्षी जाताना ती खापर पणजी होऊन गेली. इतका पसारा असतानाही ती शेवटी एकटीच गेली. मृत्यूचा अर्थ व त्याचे खरे स्वरूप कळाले.

मला ती गेली पासष्ट वर्षे शिकवत राहिली. मी इतका उच्चशिक्षित व व्यावहारिक जीवनाचे धडे मला आईइतके कोणी दिले नाहीत. सेवा ही सर्वश्रेष्ठ व मला ती करायची संधी खरंतर आईवडील दोघांनीही दिली.



पण माझे वडील माझ्या एकविसाव्या वर्षी गेले; पण आई माझ्या वडलांच्या पश्चात त्रेचाळीस वर्षे राहिली व त्यापैकी किंवा सर्वच सहवास मला लाभला.

वृद्धांची सेवा करून माणूस बुद्धिवान होतो? या यक्षाच्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले. कारण अहंकार गळून पडल्याशिवाय तुम्हाला काहीच शिकता येणार नाही.

'माझी आई' माझ्या जीवनाच्या सर्व अवस्थेमध्ये असल्यामुळे मला प्रत्येक अवस्थेत तिचा फायदा झाला. सर्वात शेवटी एकच सांगतो, कोणतेही वृद्ध माणूस आपल्या घरातील अडगळ नसून ते घराचे वैभव आहे असे समजावे, व त्यांची सेवा म्हणजे परमेश्वराचीच सेवा समजावी.

❖

## माझी कर्तबगार आई

सीमा पवार
एम.ए.

आईची माया ही काय असते हे आपल्या सर्वांनाच माहीत आहे; पण ज्या ज्यावेळेस माझा गौरव होतो, कौतुक होते, त्यावेळेस मला माझ्या आईची खूप आठवण येते. कारण आज जरी मी माझ्या पायावर उभी राहिली आहे, तरीसुद्धा माझ्या प्रत्येक कौतुकाच्या वेळी मला आईची आठवण येते. कारण या सर्वांमध्ये मोठा आणि मोलाचा वाटा आहे, तो म्हणजे माझ्या आईचा.

माझी आई माझ्यावर खूप प्रेम करते; पण शिस्तीच्या बाबतीत ती तेवढीच कडक आहे. ती सदैव शांत आणि हसतमुख असते. माझ्या आईचे नाव हिरा आहे. ती सतत काही ना काही काम करत असते. ती दूरचित्रवाणीवरचे निवडक कार्यक्रम पाहते; पण ते पाहतानाही तिचे काही तरी काम सुरू असते.

माझी आई ही भल्या पहाटे उठते. ज्यावेळेस मी आणि माझी बहीण आम्ही शिकत होतो त्यावेळेस आईचा जो दिनक्रम असायचा तो आजही कायम आहे. आजही आईच्या कोणत्याही गोष्टीत फरक पडलेला आम्हाला जाणवत नाही. माझ्या यशामध्ये सर्वात मोठे श्रेय मी माझ्या आईलाच देते. कारण लहाणपणापासून माझ्या व माझ्या बहिणीच्या अभ्यासाबाबत माझी आई अतिशय जागरूक असायची. आजही ती माझ्या मुलीच्या शिक्षणाविषयी तेवढीच काळजी करते. माझी आई खूप चांगल्या स्वभावाची आहे. प्रत्येक वेळी ती सतत दुसऱ्याला मदत करायला तयार असते. ज्याप्रमाणे प्रत्येक आईला आपले मूल लहानच वाटत असते तसेच काहीसे माझ्या आईचे माझ्याबाबतीत आहे. कारण मी आज शिक्षिका आहे. आणि माझ्या कामाच्या बाबतीतही आजही माझी आई मला सल्ला देत असते. एक शिक्षिका म्हणून मी कसे वागावे व कसे असावे मला तिच्याकडूनच कळाले. त्याचबरोबर नोकरी करत असताना



घर आणि मुले कशी संभाळावी याचा समतोल कसा राखावा हे तिने शिकवले.

माझ्या आईने माझे वडील गेल्यानंतरही धीर सोडला नाही व आम्हालाही सोडू दिला नाही. आज बरीच वर्षे झाली, माझ्या वडलांना जाऊन; पण आई मोठ्या सामर्थ्याने ती प्रत्येक संकटाला व अडचणींना सामोरी जात आहे. माझ्या आईचे शिक्षण हे केवळ नववीइतकेच आहे; पण तिच्या बोलण्याची तऱ्हा, ढब व तिचा गणितावर असलेला भर खूपच छान आहे. माझ्या आईने माझ्यासाठी खूप काही केले आहे. आणि अजूनही ती करते आहे. प्रत्येक आई मुलांसाठी करते; पण माझ्या आईने माझ्या व माझ्या बहिणीसाठी खूप काही केले आहे.

आईच्या हाताला खूप चव आहे. वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ ती बनवू शकते. कारण त्या प्रत्येक पदार्थात तिचे प्रेम असते. आईने माझ्या शिक्षणासाठी खूप कष्ट घेतले आहेत. कारण बऱ्याच वेळा शिक्षणात खूप अडचणी आल्या; पण माझी आई ही स्वत:ही खचली नाही व तिने कधी मलाही हिंमत कमी होऊ दिली नाही. आईने माझे बी. एड. चे शिक्षण होत असताना माझ्या एक वर्षांच्या मुलीला अतिशय चांगल्याप्रकारे सांभाळले व माझी कोणतीही कमी माझ्या मुलीला जाणवू दिली नाही.

खरंच प्रत्येक आई आपल्या मुलांचे भवितव्य घडवत असते; पण माझ्या आईनेही खूप मोठा वाटा उचलून माझे आयुष्य घडवले. आजही प्रत्येक कामात मी माझ्या आईचा सल्ला घेते. कारण माझा पहिला गुरू माझी आई आहे. आमच्यावर तिची खूप माया आहे. तिला सर्वांविषयी आपुलकी वाटते. पण माझ्यावर तिचे खरे प्रेम आहे. आणि अशा या प्रेमळ आईबद्दल माझ्या मनात खूप आदर आहे.

❖

# अशी माझी आई

**ईश्वर तांबे**
**बी.ए.**

आई जेव्हा घरात असते, पण ती जाणवत नसते. जेव्हा ती नसते, तेव्हा आभास झाल्यासारखे भासत असते. आईविषयी किती लिहावे व किती प्रेम, जिव्हाळा व्यक्त करावा हे कळत नाही. आईचे माहात्म्य लेखकांनी, साहित्यिकांनी, कवींनी, विचारवंतांनी, प्रत्येक क्षेत्रातील लोकांनी भरभरून लिहिले आहे. त्यांच्या जीवनात आईचे स्थान सर्वोच्च आहे. पण मी माझ्या आईविषयी प्रेमळ, वात्सल्य, तीर्थस्वरूप असे लिहीत असून जेव्हा मला कधी सतत कधीना-कधी अनेक प्रश्न पडतात. तेव्हा-तेव्हा मला ती एका मित्राप्रमाणे त्या-त्या गोष्टीची माहिती देत असते, समजून सांगत असते.

समुद्राची शाई आणि आकाशाचा कागद जरी केला तरी आईची माहिती पूर्ण होणार नाही. आईसारखे दैवत साऱ्या जगात नाही

माझ्या जन्मानंतर माझी पाच वर्षे जर माझे गुरू, शिक्षक, मित्र,माझे विश्व जर कोणी असेल तर ती माझी आईच. कारण,

**माझी माय सरसोती । मला शिकवते बोली ।।**
**लेक ईश्वराच्या मनी । किती गुपिते पेरली ।।**

माझी आई माझ्यासाठी सरस्वती आहे. तिनेच मला बोली शिकवली, नुसती बोलीच शिकवली नाही तर आयुष्यामध्ये उपयोगी पडणारी निसर्गामध्ये आढळणारी अनेक गुपिते पेरली. माझी आई तशी खूप शिकलेली नाही, पण अडाणीही नाही. तिच्या तीन अपत्यांपैकी मी सर्वांत लहान आणि लाडका. माझ्या आईने जे काही माझ्यावर लहानपणापासून संस्कारमय बाळकडू पाजले. ते मी जीवनभरही विसरू शकत नाही. कारण तेच बाळकडू मला सतत ऊर्जा देत असतात. नवचैतन्य निर्माण करत असतात.

तिने आम्हाला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. तिने कोणतीही गोष्ट



कमी पडू दिली नाही, वेळेप्रसंगी तिने मला मारलेही; पण मारण्यातही मला प्रेम जाणवतं. कारण माझ्या पायाला ठेच लागली तर माझ्या ठेचेची जखम तिच्या काळजात होते. मला आजही आठवतं की मी, सातवीला असताना भाषण स्पर्धेत जिल्ह्याला गेलो आणि तेव्हा मी रडायला लागलो. तेव्हा तिने मला कुशीत घेतले व त्याच दिवशीच्या वर्तमानपत्रातील कवितेची एक ओळ दाखवली,

**आसू सरले सरले, मःझा मालेच विसावा,**
**असा आसवा बिगर, रडू नको माझ्या जीवा.**

यावरून ती जरी कमी शिकलेली आहे, तरीही तिची दूरदृष्टी किती मोठी आहे ते कळते. मला कला शाखेत प्रवेश घेताना आईनेच मला पाठिंबा दिला होता. कारण तिला माझी आवड माहीत होती. मी हॉस्टेलला असताना तिने करून दिलेला चिवडा, लाडू, बाबांना न सांगता मला दिलेले पैसे मी कसे विसरू. कारण त्या चिवडा, लाडूची चव अजूनही माझ्या तोंडात आजही लपलेली आहे. आम्ही दोघे भाऊ बाहेर शिकायला असल्याने आई आम्हाला दिवसातून दोन वेळेस फोन करते. कारण,

**घार जाई आकाशी?**
**तिचे लक्ष पिल्लांपाशी.**

त्यामुळे ती प्रत्येक क्षणात सोबत वाटते. चार वर्षांपूर्वीची गोष्ट मला आजही आठवते की, मी आमच्या शेतातून घरी आलो. तेव्हा आमच्या वाड्याच्या दरवाजासमोर एक दलित स्त्री रडत होती. तेव्हा मी त्या स्त्रीला विचारले, तिने मला सांगितले, माझ्या मुलीच्या बाळंतपणाला तुझ्या आईने मागितल्या मागितल्या पैसे दिले. आणि ती सुखरूप बाळंतीण झाली. आणि तिला मुलगी झाली. तेव्हा मला त्या स्त्रीचे ते दुःखद अश्रू नसून ते आनंद अश्रू आहेत. त्या आनंद अश्रूंचे कारण माझी आई आहे. माझ्या आईला दुसऱ्याला काही द्यायला फार आवडते. आमच्या कामावरील लोकांच्या लहान मुलांच्या हातात काहीतरी खायला देणे किंवा दर रविवारी गावातील गरीब लोकांना ताक किंवा दही वाटणे, तिला फार आवडते; त्यामुळे तिच्या या गुणांचा प्रभाव माझ्यावरही पडला आहे.

त्यामुळे अशी आई मला मिळाल्यामुळे मी फार नशीबवान समजतो.

❖

## माझ्या श्रीमंत माता

दीपक तिरूखे
बी.ए.

माझ्यावर सर्वात जास्त प्रेम करणारी, माझे पालन करणारी, जीवनाचा अर्थ समजावून सांगून रस्ता दाखवणारी माझी 'आई' आहे.

माझ्या आईला तिच्या बहिणी 'अक्का' या नावाने बोलवतात; यामुळे आम्ही दोघे भाऊ आणि इतर भावंडे तिला अक्काच म्हणतो. आमचे कुटुंब संयुक्त असल्यामुळे आम्ही सर्व भावंडे एकत्र राहतो. या आमच्या संयुक्त कुटुंबामध्ये माझी आई सर्वात मोठी सून. माझी आई जेवढे आम्हा दोघा भावांवर प्रेम करते, तेवढेच ती आपल्या जावांच्या मुलांवर प्रेम करते. आम्हा सर्वांना तिच्याकडून सारखी शिकवण मिळते.

माझी आई बालपणी तिच्या मामाच्या गावी जास्त राहिलेली; त्यामुळे आजोळच्या आजीचे तिच्यावर जास्त संस्कार झालेले आहेत. तिच्यावर झालेले संस्कार ती आमच्यामध्ये रुजवते. दुसऱ्याचा द्वेष करायचा नाही, दुसऱ्याला नाव ठेवण्याअगोदर आपले आत्मपरीक्षण करा, भेदभाव करायचा नाही या काही गोष्टी तिने आम्हाला बालपणीच सांगितल्या. तसेच मी सर्व भावंडांत मोठा असल्याने माझ्या वर्तनाकडे तिचे अधिक लक्ष असते.

माझी आई फक्त चौथीच्या वर्गापर्यंत शिकलेली; परंतु तिचे विचार एखाद्या पदवीधारकाला झुकवतील अशा प्रकारचे आहेत. तिच्या विचारामध्ये सर्वप्रथम मुलगा-मुलगी असा भेद नाही. आम्हा भावांमध्ये आणि बहिणींमध्ये तिने कधीच भेदभाव केला नाही. आम्हाला जे काही मिळेल ते बहिणींना मिळालेच पाहिजे, असा तिचा आग्रह असतो. आमच्या गावामध्ये मुलींना दहावी या वर्गाच्या पुढे शिकवले जात नाही. गावात फक्त तीन ते पाच मुली कॉलेजचे शिक्षण घेतात. मुले मात्र पदवीधर, पदविकाधारक असलेले पाहायला मिळतात. माझी आई जरी कमी शिकलेली असली तरी आपल्या सर्व मुलांनी शिकावं अशी तिची



इच्छा आहे. माझ्या बहिणींना ती शिकण्यासाठी प्रेरित करते; यामुळेच माझ्या दोन्ही बहिणी कॉलेजचे शिक्षण घेत आहेत.

आम्ही शहरामध्ये शिक्षणासाठी राहतो. या आधुनिक आणि तीव्र गतीने चालणाऱ्या जगाचे ज्ञान आम्हाला मिळते. आम्हाला मिळालेले ज्ञान जेव्हा आम्ही माझ्या आईला सांगतो, तेव्हा ती ज्ञानाला विरोध न करता जे मिळेल ते घेऊन आपल्या विचारात सुधारणा करते. ती कधीच आपल्या जुन्या विचारांचा बाऊ करत नाही. जर जुन्या विचारांपेक्षा आलेले नवीन, आधुनिक विचार चांगले असतील तर ती नेहमी स्वीकारते.

माझी आई आमच्यावर कधीच रागवली नाही किंवा आम्हाला तिने मारले नाही. आमचे जे काही चुकले असेल ते ती समजून सांगते. तिने समजून सांगितल्यानंतर आमच्याकडून तशी चूक पुन्हा घडतच नाही. कारण चूक समजून सांगायची एक वेगळीच कला तिच्यामध्ये आहे.

काही महिन्यांपूर्वी मी शिक्षणासाठी पुण्याला येणार होतो. ज्या दिवशी मला निघायचे त्या दिवशी वडील, आजी, आजोबा, आई, सर्वजण बसले होते. मी मात्र आईच्या मांडीवर डोके ठेवून पडलो होतो. काही वेळेत निघायचे होते. सर्वजण सूचना, सल्ला देत होते. चांगला अभ्यास कर, आणि तब्येत चांगली ठेव सांगत होते. आई मात्र बोलत नव्हती. ज्यावेळी मी वरती तिच्या चेहऱ्याकडे बघितले तेव्हा तिच्या डोळ्यांत पाणी होतं; परंतु तरी तिने ते डोळ्यातून बाहेर येऊन दिले नाही. कारण मी शिक्षणासाठी जात होतो आणि तिच्या दृष्टिकोणातून शिक्षणाला अधिक महत्त्व आहे. ती नेहमी मला फक्त एकच सांगते की, "तू शिक आणि सरकारी नोकरी मिळव." खरं तर ही तिची इच्छा आहे. असेच म्हणता येईल.

आम्ही सर्व जण तिच्या इच्छेपेक्षा मोठी सरकारी नोकरी मिळवून तिची इच्छा पूर्ण करू अशी हमी आम्ही तिला दिलेली आहे. माझ्या आई प्रमाणेच माझ्या चुलत्या माता माझ्यावर आई जेवढे प्रेम करते तेवढे त्या करतात. म्हणून या तीन मातांच्या चांगल्या संस्कारांवर वाढलेली आम्ही भावंडे आहोत. या तीन मातांचे संस्कार आमच्यावर घडल्यामुळे आम्ही जगातील सर्वात श्रीमंत आहोत आणि आमच्यासारख्या माता कोणालाच नसल्याने आम्हाला त्याचा अभिमान आहे.

❖

## माझी प्रेमळ आई

रोहित भुजबळ
बी.ए.

हे जग पाहिले जिच्या आधाराने, पहिले पाऊल टाकले तिच्याच आधाराने, पहिले शब्द उच्चारला तोही 'आई'च. आई या शब्दाला माझ्या मनात नेहमी आदर व प्रेमाचे स्थान आहे. माझ्या आईचे नाव 'रेखा' आहे. आम्ही तिन्ही भावंडे आमच्या आईचा जीव की प्राण आहोत. माझी आई साधारणपणे गोल साडी, वय पस्तीस वर्षे, खोट्या गोष्टीचा प्रचंड राग असणारी आहे. ती दहावी नापास आहे. परंतु तिची बुद्धिमत्ता प्रचंड आहे. तिच्या चेहऱ्यावर कधीही राग किंवा जास्त संताप दिसत नाही. आम्हाला तीन एकर बागायती शेती असल्यामुळे तिला शेतीत खूप कष्ट करावे लागतात. तसेच शेती करताना येणाऱ्या अडचणी, दुःखे याची तिला व माझ्या वडलांना म्हणजेच 'अण्णां'ना जाणीव असल्यामुळे व आपल्या मुलांनी आपल्यासारखे शेतीत कष्ट करू नये असे तिला मनोमन वाटते; त्यामुळे तिचा आमच्या शिक्षणाला कायम आग्रह व पाठिंबा असतो.

माझ्या वडलांबरोबर आईलाही शेतातील सर्व कामे पाहावी लागतात. त्यामुळे ती सुट्टीच्या दिवशी आणि रोज शाळेतून आल्यावर आमची मदत घेत असते. परंतु फक्त शेतीतील काम करायचे आहे यासाठी तिने कधीही मला शाळेला दांडी मारू दिली नाही. तसेच तिला चांगल्याप्रकारे लिहिता वाचता येत असल्याने तिला जेव्हा वेळ मिळेल, तेव्हा ती आमच्या वह्या, पुस्तके, दप्तर पाहत असते व अभ्यास अपूर्ण असल्यास शिक्षा करत असते.

माझ्या आईचा दिनक्रम सकाळी पाच वाजल्यापासून सुरू होतो. ती सकाळी लवकर उठून गायीची स्वच्छता करते, त्यानंतर मला सहा वाजता उठवते. माझ्या वडलांना दूध काढता येत नसल्यामुळे तिलाच दूध काढावे लागते. आईने हळूहळू मला दूध काढायला शिकवले. त्यामुळे तिला माझी मदत होऊ लागली. बाहेरची सर्व कामे उरकल्यानंतर ती लवकर अंघोळ



करून गरम गरम चपाती व चहा बनवते. याचे कारण असे की तिचा पाव, बटर, टोस्ट यांसारख्या बेकरीत बनवल्या जाणाऱ्या पदार्थांवर विश्वास नाही. त्यामुळे ती आमच्यासाठी रोज सकाळी लवकर ताजे ताजे जेवण बनवते.

आम्ही सारखे वेळ मिळेल तेव्हा अभ्यास करत बसावे असे तिचे म्हणणे आहे. पण आजूबाजूची मुले क्रिकेट खेळायला लागली की, आई पण आम्हाला जरा वेळ खेळायला जाऊ देते; पण वेळेत परत येण्यास न चुकता सांगते. म्हणजेच आम्हा मुलांच्या खेळण्याला तिचा विरोध नाही पण खेळण्याबरोबर अभ्यासही महत्त्वाचा आहे. असे तिचे म्हणणे आहे.

आपल्याकडे एखादी गोष्ट असेल तर आपण ती सर्वांमध्ये वाटून घेतली पाहिजे, असे तिला वाटते. आमच्याकडे आलेल्या पाहुण्यांना किंवा इतर वाटसरूंना ती कायम जेवण करून पाठवते. नसेल तर पाणी तरी देतेच. आमच्या शेतात आंब्याची तीन-चार झाडे आहेत. त्यांना उन्हाळ्यात भरपूर आंबे येतात. तेव्हा ती माझ्या व माझ्या भावाच्या मित्रांना बोलावून त्यांना आंबे देते. तिला वाटते, आपण जर दुसऱ्याला काही दिले तरच दुसरे आपल्याला मदत करतील. मला दहावीला कमी गुण मिळाले होते. तरीही मी पुढे शास्त्र शाखेत प्रवेश घ्यावा असे तिला वाटत होते. कारण गावाकडे शास्त्र शाखा म्हणजेच सर्व काही, अशी समजूत आहे; परंतु मी आईला कला शाखेत प्रवेश घेण्याविषयी इच्छा व्यक्त केल्यावर तिने स्पष्ट नकार दिला; पण खूप समजावल्यानंतर तिने मला कला शाखेत प्रवेश घेण्यास संमती दिली.

माझी आई अतिशय प्रेमळ स्त्री आहे. ती कायम सर्वांना मदत करते; त्यामुळेच तिच्या तोंडून कधी कोणाला अपशब्द उद्गारले गेले नाहीत. तिचे कधीही आमच्या वाडीत कोणाशीही भांडण झालेले आम्हाला आठवत नाही. त्यामुळे आमच्या वाडीत तिच्याबद्दल प्रत्येकाच्या मनात प्रचंड आदर आहे. तिने आमच्यावर लहानपणापासून आजपर्यंत खूप चांगले संस्कार केले आहेत. तसेच ती आम्हा तिन्ही भावंडांची खूप काळजी करते. आमच्यावर खूप प्रेम करते; त्यामुळे मला माझी आई खूप आवडते. मी माझ्या आईवर मनापासून प्रचंड प्रेम करतो.

❖

## मातृदेवो भव

रोजा चावरे
बी.ए.

माझी आई माझ्यासाठी खूप काही करीत असते. बालपणापासून ते आतापर्यंत व पुढेसुद्धा करीत राहील. शाळेची तयारी करून देणे, अभ्यास घेणे-शिकवणीला कोठेही न जाता केवळ आईचेच मार्गदर्शन अधिक मोलाचे ठरले. कधी कधी आई काही कारणास्तव गावी गेली की मला मात्र मुळीच तिच्याशिवाय करमत नसे. ती कधी एकदा परत येईल असे वाटते; पण माझ्या आईची ही स्थिती माझ्यासारखीच असते. ती जरी गावी गेली असली तरी तिचे संपूर्ण लक्ष हे आपल्या मुलांकडेच असते. दिवसातून कितीतरी वेळा फोन ती करीत असते. म्हणूनच शरीराने जरी ती तिकडे असते; पण मन मात्र असते तिचे इकडे. मायालेकींचे कधी खटके उडतात किंवा परस्परांवर राग धरला जातो. पण हा राग दोघीही जास्त काळ मात्र टिकवू शकत नाहीत; एकमेकींचा अबोला हा सहनच होत नाही. म्हणूनच मला वाटते, की वाद होतात, मतभेद होतात; पण त्याने मायेचे नाते तुटत नाही. तसेच रागातदेखील प्रेम, माया असते. म्हणून म्हणतात ना,''तुझे-माझे जमेना, आणि तुझ्यावाचून करमेना!''

एकदा लहानपणी मला गणित जमत नव्हते; पण शेवटी मला तिने व्यवस्थितरीत्या समजावून सांगितले. आजपर्यंत माझा अभ्यास तीच घेत असे. मी स्वत:हून कितीही अभ्यास केला तरी माझी उजळणी रोजच्या रोज घेतल्याशिवाय चैन पडत नसे; त्यामुळे मला नियमित अध्ययनाची आवड व सवय निर्माण झाली. म्हणून कोणतीही शिकवणी, ट्यूशन न लावता बारावीपर्यंत उत्तम गुणांनी दरवर्षी पास होत गेले. तसेच माझ्या विविध कलागुणांना ती सतत प्रोत्साहन देत असते.

माझ्या आईला नोकरी आलेली असतानादेखील तिने नाकारली. कारण ती म्हणते, माझे प्रथम कर्तव्य हे सासू-सासऱ्यांना, मुलाबाळांना सांभाळणे असे आहे. माझे आजी-आजोबा देखील खूपच प्रेमळ होते.



एकदा वडलांची बदली झाली. तेव्हा ते आम्हाला बदलीच्या ठिकाणी नेण्यासाठी आले; पण आई म्हणाली, ''सासू-सासरे आपल्याबरोबर येत असतील तरच मी येईन.'' मात्र, आजी-आजोबा हे जुन्या विचारसरणीचे असल्यामुळे गाव-घर सोडण्यास तयार नव्हते. शेवटी आईनेही नकार दिला. तिने आपल्या मुलांचासुद्धा विचार केला नाही. गावामध्ये मराठी शाळा होती. मात्र इंग्लिश माध्यमाची शाळा नव्हती. एवढ्यासाठी वडील आम्हाला नेण्यासाठी आले होते; पण माझ्या आईने आम्हाला मातृभाषेतच शिक्षण दिले.

आई नेहमी म्हणते, ''माणूस जिवंत असतानाच त्याच्या इच्छा पूर्ण कराव्यात. नंतर तो गेल्यावर मी हे केले असते, मी ते केले असते असे म्हणू नये.'' या तत्त्वाशी एकनिष्ठ राहणारी माझी आई. माझ्या आजी-आजोबांची शेवटपर्यंत तिने सेवा केली; त्यामुळे माझे आजोबा मला म्हणायचे, तुझी आई फार गुणी आहे.

माझ्या आईला माझ्या बाबांचा खूपच पाठिंबा असतो. माझी आई गावी गेली अथवा स्वाध्याय केंद्रात गेली तर माझे बाबा पूर्णपणे घर सांभाळतात. तसेच ते स्वयंपाकदेखील करतात. त्यामुळे आई निश्चिंत असते. कार्यक्रम असो किंवा काहीही असो, सर्वप्रथम माझे बाबा स्त्रियांना जेवावयास सांगतात. प्रत्येकाशी ते खूपच आदराने, प्रेमाने वागतात; त्यामुळे माझ्या आईला त्यांचा फारच अभिमान वाटतो.

''आईच्या मायेला उपमा कशाची, आईपुढे किंमत शून्य जगाची.'' खरेच, आईचे माहात्म्य फार थोर आहे. ती घरातल्या प्रत्येकासाठी एखाद्या काठीच्या आधारासारखी पाठीशी उभी असते. तसेच मनुष्याची काळजी घेण्यासाठी देवाने स्वत:चा अंश आईच्या रूपाने पाठविला आहे, असे वाटते. ती कोणतीही तक्रार न करता सर्व काही आपल्यासाठी सहन करीत असते. म्हणूनच सुविद्य, संयम स्त्री शक्तीस कसलीही बाधा येऊ शकत नाही. ''जो हिरा गवसला त्यास पैलू पाडण्याचे काम हे आपलेच!'' असे मनी बाळगून ती अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीत आपले कर्तव्य पार पाडीत असते. आईशिवाय घरातल्या प्रत्येकाचे पान अडत असते. सकाळपासून ते रात्री झोपेपर्यंत ती काम करीत असते.

जी आई लहानाचे मोठे करते, आपल्या सर्वांसाठी कष्ट उपसत असते, छोट्या-मोठ्या गोष्टींतून ती हट्ट पूर्ण करीत असते; पण मुले मोठी झाली की या आईकडे मात्र दुर्लक्ष करतात. ते आपल्याच विश्वात रममाण

होतात. आईने आपल्यासाठी घेतलेले ते कष्ट, केलेला तो त्याग, पुरविलेला हट्ट या सर्वांचा मुलांना विसर पडतो व आईचा विचार करण्याच्या आतच पटकन आदेश दिला जातो तो म्हणजे वृद्धाश्रम असे. वृद्धाश्रम दाखविणारे खूप लोक आहेत.

आई, म्हणजे यश, त्याग, कीर्ती होय. सगळ्या गोष्टी आयुष्यात पुन्हा मिळतील पण 'आई' ही एकदाच मिळते; त्यामुळे आईचा मान राखावा, 'आई' शब्दाने काळजाला पीळ पडतो. तसेच 'आई' शब्दाचे सामर्थ्य अगाध आहे. जोपर्यंत आई आहे, तोपर्यंत तिची काळजी घ्यावी. गेल्यावर परत येत नाही हेही तितकेच ध्यानी घ्यावे.

❖



## माझी कष्टाळू आई

आशा खटिंग
बी.ए.

माझी आई खूप कष्टाळू आहे. ती अशिक्षित आहे; परंतु कधीही माझ्या आईने तो अशिक्षितपणा आपल्या दैनंदिन व्यवहारात कधीही दिसून दिला नाही. ती स्वत: कष्ट करून आम्हा सर्वांना सांभाळते. ती शिक्षण घेऊ शकली नाही; परंतु ती आम्हाला शिकवत आहे. ती आमच्या शिक्षणात कधीही त्रास होईल असं काहीही होऊ देत नाही. माझ्या आईचे आमच्या शिक्षणाकडे खूप लक्ष असते. आज माझी आई कष्ट करते, मेहनत घेते; म्हणून आज आम्ही सर्व भावंडे शिकत आहोत.

माझी आई कधी बाजारात गेली तर स्वत:साठी काहीही न खरेदी करता आमच्यासाठी छान प्रकारचा खाऊ घेऊन घरी येते. ती आम्हा भावंडांमध्ये कसलाही भेदभाव करत नाही. ती आम्हा सर्वांना समान वागणूक देते. माझी आई खूप प्रेमळ आहे. ती सर्वांवर प्रेम करते. दुसऱ्यांना मदत करते. दुसऱ्यांच्या अडचणी समजून घेते. माझ्या आईचं गायीगुरांवर, झाडामाडांवर, फुलांपाखरांवर प्रेम आहे. ती कधीही जनावरांना मारत नाही. माझ्या आईने आमच्या घराभोवती भरपूर झाडे लावलेली आहेत. प्रत्येक आईचे आपल्या मुलांवर प्रेम असते. तसेच माझ्या आईचं आमच्यावर खूप प्रेम आहे.

'आई हा माझ्या आयुष्यातील पहिला गुरू आहे.' आईने मला जन्म दिला नसता तर मी हे विश्वच बघू शकले नसते. आई माझी अडाणी असली तरी ती काही बाबतींत खूप हुशार आहे. तिच्याकडे चांगल्या गोष्टींचे ज्ञान आहे. ती आम्हाला खूप चांगल्या गोष्टी सांगते. माझी आई म्हणते, आपल्या आयुष्यात खूप सारी संकटे येतात व त्या संकटांवर मात करण्याची हिंमत ही सगळ्यांमध्येच असते असे नाही; परंतु मला माझ्या आईने संकटावर मात करायला शिकवले आहे. माझी आई कायम म्हणत असते की, दु:खाचा शेवट केल्याशिवाय सुखाचा आनंद मिळत नाही.

आणि सुखाचा आनंद घेण्यासाठी दुःखावर विजय मिळवायला हवा. मनुष्याचे आयुष्य हे दुःख, वेदना, नैराश्य, संकटे यांनी भरलेलेच आहे; परंतु जो मनुष्य या सर्वांवर मात करून विजय मिळवतो तोच खरा मनुष्य हे मला माझ्या आईने शिकवले. माझी आई मला एक वाक्य नेहमी सांगत असते. ते म्हणजे–

**''हजारो निराशेच्या गोष्टींत एक अमर आशा लपलेली असते.''**

माझ्या मनामध्ये कधी कधी काही कारणांनी वाईट विचार आले तर मला माझ्या आईनं म्हटलेले वरील वाक्य आठवते व मी माझ्या प्रवासाला लागते.

माझी आई जितकी प्रेमळ आहे, तितकीच ती शिस्तप्रियही आहे. माझ्या आईला खोटेपणाचा खूप राग येतो. आणि दुसऱ्यावर विनाकारण होणारा अन्याय यांचाही तिला राग येतो. माझी आई कायम दुसऱ्यांना मदत करते. तिचा हा गुण मला खूप आवडतो. माझी आई उत्तम प्रकारे स्वयंपाक बनवते. तिने केलेला स्वयंपाक हा आमच्या घरात सगळ्यांना आवडतो. आई कधीही आम्हाला ओरडून बोलत नाही. जे काही असेल ते नीट समजावून सांगते. माझी आई देवाला मानते. तिच्या मते कुठे तरी परमेश्वराचं अस्तित्व आहे. रोज पूजा करणे व संध्याकाळी देवाला दिवा लावणे. एवढंच ती देवाबाबत करते. अति करणे तिला आवडत नाही. भोंदूबाबा, जादूटोणा यांच्यावर तिचा विश्वास नाही; परंतु ग्रामीण भागात राहत असल्यामुळे थोड्याफार अंधश्रद्धा ती बाळगते. परंतु तिला ते खरे वाटत नाही.

माझी आई खूप प्रेमळ आहे आणि या प्रेमळ आईसाठी मी काहीतरी करणार आहे. जेणेकरून ती आनंदात राहील. आजपर्यंत तिने माझ्यासाठी कष्ट घेतले. माझे शिक्षण पूर्ण व्हावे यासाठी ती दिवसभर शेतात काम करत राहिली. इथून पुढे मी कष्ट करणार आणि तिला सुखी ठेवणार. तिला ग्रामीण भागातून अंधश्रद्धेच्या चौकटीतून बाहेर आणून शहरातील जीवन पाहयला आणणार. तिने ज्या गोष्टी कधीही बघितल्या नाहीत अशा चैतन्यमय गोष्टी मी तिला शहरात आल्यानंतर दाखवणार. माझ्याकडून जेवढा होईल तेवढा आनंद तिला देण्याचा प्रयत्न करणार.

❖

**माये**

आठवतंय का माये,
काट्यात लपलेली वाट
आम्हाला तू दावली होतीस,
अंग भाजत्या उन्हामध्ये
तूच माझी सावली होतीस!

आठवतंय का माये,
तप्त दुपारी थंड वारा घालत होतीस
तहानलेल्या शुष्क मनाचा
प्रेमळ झरा झाली होतीस !

आठवतंय का माये,
पिल्लांना घास भरवून, अर्धपोटी निजली होतीस
आणि पिल्लांच्या जगण्यासाठी
चंदनापरी झिजली होतीस !

आठवतंय का माये,
संसार सावरताना उसनउधारी केली होतीस,
वादळवाऱ्यातही लेकरांना
विचारशिदोरी दिली होतीस !

आठवतंय का माये,
त्या वळणावर, नयनांतील अश्रूंना तू संपवलं होतंस
काळीज घट्ट करून लेकरांना
आकाशभरारीस पाठवलं होतंस !

**प्रा.डॉ. राजेंद्र झुंजारराव**
प्राचार्य,
मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
शिवाजीनगर, पुणे ५

स्नेहवर्धन
प्रकाशन